# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७८/२००८.

श्री. रायभान गोमाजी कौरती,
मु. सोनखांब, पो. मेटपांजरा,
ता. काटोल, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
लोहमार्ग, नागपूर.

श्री. ए. ए. कंखरे,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस निरिक्षक,
पोलीस उपअधिक्षक,
लोहमार्ग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, लोहमार्ग, नागपूर यांच्याकडे विभागीय चौकशी संदर्भातील कागदपत्रांची एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती तयार असल्याचे कळविल्यानंतर प्रत्यक्ष घेऊन जाण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा असे सांगितले की, अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली नाही किंवा प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्या क्रमांक १ मध्ये त्यांना दिनांक ३.१०.२००६ रोजीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती उपलब्ध नाही. मुद्या क्रमांक ४ व ५ मध्ये नस्तीची तारीख दिलेली नाही. त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित लिपिकांना आदेश दिले होते. तशी आयोगापुढे नोटशिट दाखल केलेली आहे व त्या नोटशिटवरुन माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता आदेश दिलेले आहेत. परंतु सबंधित लिपिक यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु त्यांनी आदेश दिलेले असून सुध्दा संबंधित लिपिकांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे ज्या अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेतले होते किंवा आदेश दिले जातात त्यांना सुध्दा माहिती अधिकारी संबोधीले जाते. त्यामुळे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे त्यांना माहिती अधिकारी समजून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. परंतु प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समोर सादर झाले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे सदरचे सादरीकरण ज्यांनी केले नसेल त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.८.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत योग्य ती माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांनी तसे आदेश दिलेले असले तरी संबंधित लिपिक यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येते.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस अधिक्षक, लोहमार्ग, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६२८- १६३१/४.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५८५/२००८.**

श्री. संजय मुकुंदराव चिचखेडे,
मु. पो. कोहळी,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमेश्वर,
जि. नागपूर.

श्रीमती सुजाता ना. चांभार,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
(शिक्षण विभाग),
पंचायत समिती, कळमेश्वर,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती, कळमेश्वर यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते व त्यात अनेक पोटकलमे आहेत. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २१.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना रुपये ८००/- चा भरणा करण्याबाबतचे पत्र

... २

मिळाले होते. त्यापत्रावर तारीख १०.६.२००८ आहे असे दिसून येते. यावरुन विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही. मात्र माहिती जी उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण व खोटी आहे असे म्हणणे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडे कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे उपलब्ध नाही असे त्यांनी सांगितले. कार्यालयात सुध्दा कागदपत्रे उपलब्ध नाही असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर झाले नाही किंवा कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी सादर केलेला नाही. मात्र दिनांक ३.७.२००८ रोजी माहिती पुरविण्यात येत आहे अशा प्रकारची कागदपत्रे दिलेली दिसून येतात यावरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १४.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संपूर्ण माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तशी माहिती उपलब्ध करुन न दिल्यास अपीलकर्ता यांनी अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे आयोगाकडे तक्रार दाखल करता येईल व त्यानंतर विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६३२- १६३३/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९३/२००८.

श्री. इमरान इनायतुल्ला चिश्ती,
हॉटेल अल जम जम जवळ,
आझमशहा चौक, मस्जिदच्या बाजुला,
सी. ए. रोड, जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक (नगर रचना),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचेवतीने श्री. राजु रहाटे, उपविभागीय अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. हॉटेल अल जम जम चा नकाशा दिनांक २५.४.२००८ रोजी ना मंजूर करण्यात आला आहे. याची माहिती आपण मा.पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना कां पाठविली नाही. याची सविस्तर माहिती मिळण्याबाबत आणि साक्षांकित प्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती स्पीड पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे

अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.७.२००८ रोजी देण्यात आलेला असून त्वरित लेखी कळविण्यात यावे असा आदेश दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १४.७.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने आणि दस्तावेजाचा भाग नसल्यामुळे आपण मागितलेली माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक २५.८.२००८ रोजी आपण मागितलेली पोलीस आयुक्त यांचे दिनांक ३.९.२००७ च्या अन्वये हॉटेल अल झम झम विरुध्द तक्रारबाबतचे पत्राची पोलीस आयुक्त यांना पाठविलेली प्रत देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी तत्पुर्वी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, झोनकडे सदरची माहिती मागितलेली होती. परंतु कोणत्याही प्रकारची कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेली नाही त्यामुळे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे स्पष्ट होते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय देतांना माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे देता येत नाही. परंतु मागितलेल्या माहितीचे कोणतेही विश्लेषण केले नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १४.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १४.८.२००८ रोजी पोलीस आयुक्त यांना पत्र पाठविण्यात आले व त्या पत्राची माहिती अपीलकर्ता यांना देण्यात आली. त्यामुळे माहितीचा अर्ज दाखल केला त्याच वेळेसचे आहे. अर्थात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे महत्वाचे असल्यामुळे अपीलकर्ता यांना अजून पर्यंत त्यांनी विचारलेली प्रश्नार्थक माहिती मिळाली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६३४- १६३६/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९५/२००८.

श्री. कवडू बुधाजी सराटे,
नवीन गुमगांव, इंदिरा आवास योजना,
वागधरा, ता. हिंगणा, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कुळमेथे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

श्री. फेंडरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर ग्रामीण, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सबब उपरोक्त विषयाशी संबंधित सर्व कागदपत्र सह अर्जदार पुन्हा हा अर्ज आपल्या समक्ष सादर करीत आहे. कृपया त्याप्रमाणे अर्जदाराला उपरोक्त मामल्याच्या आर.आर.सी. प्रकरण क्र. २०५/११५ च्या हुकुमान्याची प्रत व या प्रकरणातील लिलावाची पूर्ण तपशीलाची प्रमाणित उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने संबंधितांना योग्य ते निर्देश द्याल ही विनंती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.४.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी तहसीलदार, नागपूर ग्रामीण यांना अर्जदारास उचित मार्गदर्शनासह आवश्यक माहिती पुरवावी असे कळविलेले

दिसून येते. दिनांक ५.५.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी पुन्हा तहसीलदार यांना एक पत्र दिलेले दिसून येते. दिनांक २१.७.२००८ रोजी मागितलेली माहिती ही १९६९ या वर्षातील आहे. तहसील कार्यालय नागपूर ग्रामीण सन १९८१ ला उघडण्यात आले. त्यामुळे आपणास पाहिजे असलेली माहिती तहसीलदार नागपूर (शहर) यांचेकडून आपणास प्राप्त होऊ शकेल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी तहसीलदार, नागपूर शहर यांचेशी संपर्क साधून माहिती मागितलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु त्यासंदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांनी हे मुळ प्रकरण पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता उपविभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे पाठविण्यात आलेले दिसून येते. परंतु यात कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांनी स्पष्टपणे कळविण्यात आलेली दिसून येत नाही. मात्र आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांनी ७/१२ उतारा दाखवून सदरचे शेत हे बॅकंच्या लिलावाने विकले आहे अशी नोंद करण्यात आली आहे व त्यामुळे सदरची माहिती ही तहसीलदार कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र अपीलकर्ता यांनी सुध्दा सदरची माहिती बॅकेत सुध्दा उपलब्ध नाही असे म्हटले आहे. सन १९६५-७० ची माहिती बॅकेत उपलब्ध नाही. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी तहसील कार्यालयात मागितलेली दिसून येते. परंतु तहसीलदार ग्रामीण किंवा उपविभागीय अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अतिशय जुनी असल्यामुळे व ७/१२ वर नोंद असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६३७- १६३८/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९४/२००८.

श्री. मुश्ताक अहमद अब्दुल जब्बार,
मोमीनपूरा, पोलीस चौकी जवळ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कुळमेथे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

श्री. प्रमोद मते,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागपूर यांचेकडे मौजा भानखेडा ख.क्र. ८९/१ ते ८९/१९ चा पाच सालांचा खसरा प्रत व ५३-५४ चा कार्यवाहीचा नकाशा उपलब्ध असल्यास मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.५.२००८ रोजी माहिती उपलब्ध नाही असे कळविले व अर्जासोबत जोडलेला नकाशा हा काल्पनीक नकाशा आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक २१.५.२००८ रोजी उपविभागीय

... २

अधिकारी, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने सुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध नाही अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९२/२००८.

श्री. इमरान इनायतुल्ला चिश्ती,
हॉटेल अल झम झम जवळ,
आझमशहा चौक, मस्जिदच्या बाजुला,
सी. ए. रोड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त, (मुख्यालय),
नागपूर.

श्री. ए. ए. पठाण,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ ३, नागपूर शहर यांचे पत्र क्रमांक पोउपाआ/परि-३/वाचक २०९२/२००८ दिनांक २५.३.२००८ यात त्यांनी मा.पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना हॉटेल अल झम झम चे परवाना रद्य करण्याकरिता शिफारस केली आहे. यावर मा.पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचेतर्फे करण्यात आलेली कार्यवाहीची साक्षांकित प्रत मिळण्याबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निर्णय घेण्यात आलेला नाही व घेण्यात

... २

आल्यानंतर कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे निर्णय झाल्यावर कळविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. आज सुध्दा त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय झाला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांना निर्णय झाल्यावर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना अंशतः माहिती उपलब्ध झाली असली तरी निर्णय झाल्यावर माहिती उपलब्ध करुन द्यावी. याकरिता सदरचे अपील हे मंजूर करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६४१- १६४२/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९६/२००८.

श्री. राजू लोकमत,
झिंगाबाई टाकळी, गितानगर,
पो. मानकापूर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर.

श्री. सी. आर. वाघ,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता अनुमती गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००५ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांचेकडे एकूण १९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.५.२००७ व दिनांक ६.६.२००७ रोजी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांनी अपीलकर्ता यांचे अर्जास रुपये ५/- चे न्यायालयीन मुद्रांक लावला असल्यामुळे पुन्हा रुपये ५/- शुल्क पाठवावा म्हणजे आवश्यक ती माहिती पुरविता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता हे हजर झाले नाही किंवा योग्य ती कार्यवाही केली नाही असे केलेले नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक २७.५.२००७

... २

रोजी दाखल केले होते. परंतु अपीलकर्ता यांना कळवून सुध्दा त्यांनी त्रुटीची पुर्तता केली नसल्यामुळे माहिती पुरविता आली नाही. माहिती तयार आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. आयोगानी सुध्दा अपीलकर्ता यांना आज सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी नोटीस काढली होती. परंतु सदरची नोटीस परत आलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६४३- १६४४/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५८८/२००८.

श्री. मनोजकुमार नेमाजी शहारे,
द्वारा - महेश वंजारी,
मु. भिलगांव, पो. खैरी,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
धर्मदाय सहआयुक्त,
नागपूर.

श्री. धम्मचारी प्रज्ञारत्न,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासक,
त्रैलोक्य बौध्द महासंघ सहाय्यक गण,
भिलगांव, कामठी रोड, नागपूर - ४४१ ००२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. ए. बी. अमरशेट्टीवार, निरिक्षक हे हजर आहेत. माहिती अधिकारी हजर असून त्यांच्या वतीने श्री. व्ही. एम. गडकरी, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासक, त्रैलोक्य बौध्द महासंघ सहाय्यक गण, नागलोक शाखा, भिलगांव यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शुल्कासहीत टपाल खर्चाची मागणी पाठवावी असे नमुद केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२००९ रोजी सदरचा कायदा हा संस्थेस लागू नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे

... २

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी प्रथम अपील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासक यांचे तर्फे श्री. वंदन गडकरी, वकील हे हजर होते व त्यांनी युक्तिवाद करतांना सदरचा कायदा लागू होत नाही असे त्यांनी युक्तिवाद केला. परंतु त्याबाबतचे विश्लेषण केले नाही. जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी असे सांगितले की, सदरची संस्था ही धर्मदाय संस्था असून धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द केलेली आहे व तसे शासनाचा कोणताही निधी उपलब्ध होत नाही. परंतु मुळ सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे धर्मदाय आयुक्त यांचे संपूर्ण नियंत्रण हे सर्व धर्मदाय संस्थांवर असल्यामुळे धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे हे माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ च्या माहिती या व्याख्ये प्रमाणे सुसंगत होईल त्यावर धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना संस्थेची माहिती जी उपलब्ध होती ती त्यांनी दिलेली आहे. परंतु ठराव त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु संस्थेचे प्रशासक यांनी संस्थेचा ठराव उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल अन्यथा धर्मदाय आयुक्त यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देणे ठरेल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संस्थेचे प्रशासक यांनी संस्थेच्या ठरावाची प्रत अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६४५- १६४६/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०३/२००८.

श्री. वसंतराव जगन्नाथराव मोरे,
मु. चेक नवेगांव, पो. नवेगांव मोरेभिलगांव, पो. खैरी,
ता. पोभुर्णा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
चंद्रपूर.

श्री. वा. म. पंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
पोंभुर्णा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी तालुका कृषि अधिकारी तथा माहिती अधिकारी, पोथुर्णा यांचेकडे एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी, पोभुर्णा यांचेकडे माहिती उपलब्ध झाल्याबाबत लेखी निवेदन दिलेले असून याप्रमाणे सुरुवातीपासून आतापर्यंत राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती अचूक व बरोबर प्राप्त झालेली असून माझे याविषयी पुर्णपणे समाधान झालेले आहे. मध्यस्थी मोजक्या अल्पकाळात वेळेच्या आंत काही उपक्रम राबवू शकलो नाही असा गैरसमज झालेला होता. परंतु आता वस्तुस्थिती जाणून घेतल्यामुळे एकदंरीत गैरसमज दूर झालेला असून कुठलीही तक्रार नाही. असे लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ५.५.२००९**

HIREKHAN/BHUJI/१६४७/४.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६२३/२००८.

श्री. तोरण हरीशकुमार नायडू,
२३, सप्तश्रृंगी विहार, शिव मंदीर मागे,
एच.बी.इस्टेट, सोनेगांव, नागपूर- ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. दिगंबर मेहरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.५.२००८ रोजी वार्ड अधिकारी, लक्ष्मीनगर झोन क्रमांक १ यांचेकडे माहिती मिळण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.६.२००८ रोजी देण्यात आला असून ८ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००९ रोजी माहिती देण्यात आलेली आहे याचा अर्थ आयोगाने दिनांक ४.४.२००९ रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी झोन मधून हालचाली सुरु झाल्या व यावरुन झोन मधील अधिकारी माहितीच्या विलंबास जबाबदार आहेत असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती असतेच असे नाही. त्याबद्यल त्यांनी झोन अधिकाऱ्यांकडे किंवा कर्मचाऱ्यांकडे माहिती उपलब्ध असते. त्यांचेकडून माहिती घ्यावी लागते. त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २.५.२००८ रोजी लक्ष्मीनगर झोन क्रमांक १ यांचेकडे पत्र दिलेले दिसून येते व त्यामुळे अधिनियमाचे कलम ५(४) (५) प्रमाणे संबंधित झोन मधील अधिकारी हे माहिती अधिकारी समजणे आवश्यक राहील व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>**आ दे श**</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे लक्ष्मीनगर झोन क्रमांक १ मधील संबंधित अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी जबाबदारी निश्चित करुन करावयाची आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ६.५.२००९**

HIREKHAN/BHUJI/१६४८- १६४९/६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१९/२००८.**

श्री. माणिकराव सुखदेवराव निशानराव,
प्लॉट नं. १, रोड नं. १, अंजली निवास,
ताजनगर जवळ, विश्वकर्मानगर, नागपूर- ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. डी. एस. गाढवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास योजना,
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. जी. के. हिवराळे,
जनमाहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दर्यापूर,
जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००८ रोजी गट विकास अधिकारी, दर्यापूर यांचेकडे मौजा कलमगव्हाण एलीचपूर मधील विकास कामाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.३.२००८ रोजी काही माहिती दिली. काही माहिती दिनांक ४.६.२००८ रोजी दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले व त्यानंतर दिनांक ३०.६.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली असे लेखी दिलेले असुन सुध्दा सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाली म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यापक, जुनी व किचकट असल्यामुळे व अनेक प्रकारची असल्यामुळे एकत्रित नसून ती टप्प्याटप्प्याने दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आली असली तरी माहिती उपलब्ध झाली असल्याने अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ६.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१८/२००८.

श्री. माणिकराव सुखदेवराव निशानराव,
प्लॉट नं. १, रोड नं. १, अंजली निवास,
ताजनगर जवळ, विश्वकर्मानगर, नागपूर- ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,
अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
दर्यापूर, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. संजय मुरतकर, सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.४.२००८ रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद, दर्यापूर तसेच उपविभागीय अधिकारी, तहसील दर्यापूर यांचेकडे एकाच अर्जामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही तहसील कार्यालय, अंजनगांव सुर्जी येथील असल्यामुळे त्यांचेकडून त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याबद्यलचे पत्र दिले होते. परंतु तहसील कार्यालय, अंजनगांव सुर्जी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००८ रोजी प्रथम अपील जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व त्यात सहाय्यक माहिती अधिकारी यांनी सांगितले की, संपूर्ण माहिती ही जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. ... २

३. अपीलकर्ता यांना जी माहिती विलंबाने उपलब्ध झाली त्याकरिता तहसील कार्यालय, अंजनगांव सुर्जी येथील अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. तसेच सहाय्यक माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन दिली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.४.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे अपीलकर्ता यांनी सांगितले. याचा अर्थ आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.४.२००९ रोजी नोटीस काढल्यानंतर अपीलकर्ता यांना जिल्हाधिकारी कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावरुन सदरची माहिती उपलब्ध होण्यास तहसील कार्यालय, अंजनगांव सुर्जी व जिल्हाधिकारी कार्यालय हे जबाबदार आहेत. आज जनमाहिती अधिकारी हजर नाहीत तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी हजर नाहीत. त्याकरिता त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तहसील कार्यालय, अंजनगांव सुर्जी येथील अधिकारी किंवा कर्मचारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असतील त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

२) जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयात अपीलाची सुनावणीचे वेळेस माहिती उपलब्ध करुन दिली असून सुध्दा अपीलकर्ता यांनी ही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी, अमरावती यांनी करावयाची असून सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६५२- १६५३/६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६२०/२००८.**

श्री. बन्सु डोनुजी कोडापे,
पोलीस उपनिरिक्षक,
पोलीस स्टेशन मोरगांव अर्जुनी,
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक,
विशेष पोलीस महानिरिक्षक,
नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

श्री. दिनेश हागे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा पोलीस उपअधिक्षक,
गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, गोंदिया यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती ही उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे असल्यामुळे अर्ज त्यांचेकडे करावा हे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या माहितीच्या प्रती सुध्दा त्यांना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००९ लेखी कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.१०.२००८ रोजी अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. तसेच पुन्हा दिनांक २४.६.२००८ अपीलावर निर्णय झालेली कार्यवाही सुध्दा त्यांना कळविण्यात आलेली आहे.

... २

३.	जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे. सविनय सादर आहे की, उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्राचे अनुषंगाने अर्जदार श्री. बन्सु डोनुजी कोडापे, पोलीस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन, अर्जुनी/मोर यांनी दिनांक ३०.३.२००८ चा अर्ज दिला की, गैरअर्ज चा.पो.शि. युवराज सव्वालाखे ब.नं. १२६४ पो.स्टे. अर्जुनी/मोर हा जिपने नवेगांवबांध येथे जायचे होते. तो गैरहजर असल्याने स्टेशन डायरीमध्ये गैरहजरी टाकली या कारणावरुन, मायबहिणीच्या शिव्या देऊन बंदुकीने व गाडीने ठार मारण्याची धमकी दिल्याबाबत तक्रार दिल्याने या अर्जाची चौकशी सुरु असतांना दिनांक ३०.५.२००८ चा जिल्हा पोलीस अधिक्षक, गोंदिया यांचे नांवे केलेल्या कार्यवाहीची प्रमाणित प्रत मिळण्यास माहिती अधिकार अधिनियमान्वये अर्ज दाखल केला. परंतु पोलीस अधिक्षक, गोंदिया हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. अर्जदाराचे अर्ज विहित नमुन्यात केलेला नसल्याने आणि पोलीस अधिक्षक कार्यालय, गोंदिया येथे जनमाहिती अधिकारी पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) गोंदिया हे आहेत. माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे अर्जदाराला माहिती हवी असल्यास जनमाहिती अाकिारी पोलीस अधिक्षक कार्यालय, गोंदिया यांचे नावे सुधारित अर्ज करुन माहिती मिळविण्यास या कार्यालयाचे जा.क्र.कक्ष-१७/केमाअ/३३/२००८, दिनांक ३.६.२००८ अन्वये अर्जदाराला लेखी सुचना देण्यात आली आहे. अर्जदारानी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये विहित नमुन्यात अर्ज सादर केलेला नाही. परंतु या कार्यालयाकडे प्रकरण असल्याने अर्जदाराला सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाहीची प्रक्रिया सुरु असल्याने या कार्यालयाचे जावक सम क्रमांक दिनांक ९.७.२००८ अन्वये लेखी सुचना देण्यात आलेली आहे. विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकउे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक २६.६.२००८ चा अपील अर्ज दिल्याने विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक नाप/डी-६/तक्रार/माहिती अधिकार/अपील/०८-६०६२, दिनांक ३०.७.२००८ अन्वये सुचित केलेले आहे. चा.पो.शि.युवराज सव्वालाखे ब.नं. १२६४ याची बदली पोलीस स्टेशन अर्जुनी/मोर येथून या कार्यालयाचे आदेश क्रमांक पो.अ.गो/कक्ष-७/चा.पो.कर्म./बदली/२००८, दिनांक ३१.७.२००८ अन्वये पोलीस स्टेशन, सालेकसा येथे करण्यात आली. सदर कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली असून प्रक्रिया सुरु असल्याची अर्जदारास दिनांक १६.१०.२००८ अन्वये लेखी समज देण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्याची विभागीय चौकशीची प्रक्रिया पुर्ण झाल्याने या

... ३

कार्यालयाचे अंतीम आदेश क्रमांक कक्ष-८/वि.चौ./चा.पो.शि./१२६४/०९-५२०३, गोंदिया दिनांक २४.४.२००९ अन्वये त्या पुढील देय वार्षिक वेतनवाढ ही तीन वर्षाकरिता स्थगित ठेवण्याची शिक्षा देण्यात आली आहे. अर्जदारानी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती पुरविण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी दिनांक ३०.३.२००८ चे दिलेल्या अर्जावर चौकशीची प्रक्रिया सुरु असल्याने अर्जदाराला दिनांक ९.७.२००८ व दिनांक १६.१०.२००८ अन्वये लेखी सुचना आणि दिनांक ३०.४.२००९ अन्वये अंतीम कार्यवाहीची लेखी सुचना देण्यात आली आहे. अर्जदार/अपीलकर्ता यांना त्यांनी अपेक्षित केलेली माहितीबाबत लेखी कळविलेले आहे. अर्जदारानी योग्य मार्गानी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अर्ज केलेला नाही. जेव्हा की उपविभाग, देवरी येथील जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, देवरी हे आहेत. त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक कार्यालयात जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) गोंदिया हे आहेत. वास्तविक अशा प्रकारची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. एक वेळ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर त्या तक्रारीचा स्वतंत्रपणे पाठपूरावा करणे हे अपेक्षित असते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीचा असा गैरवापर करणे योग्य नाही. वरील बाबी वरुन अर्जदारानी/अपीलकर्ता यांनी केलेला अपील अर्ज नामंजूर करण्यास पात्र आहे. यावरुन अपीलकर्ता यांना पूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६५४- १६५६/६.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६२६/२००८.

श्री. डॉ. एच.एस. कनोजे,
पोलीस उपनिरिक्षक,
पोलीस स्टेशन मोरगांव अर्जुनी,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गोविंद नांदेडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. मुस्ताक मंसुरी,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
वसंत प्रकाश उर्दु कनिष्ठ महाविद्यालय,
आझाद कॉलनी, ताजबाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे कार्यालयात मुस्ताक अहमद खान यांचे दिनांक ९.५.२००३ नुसार वसंत प्रकाश उर्दु ज्युनिअर कॉलेज हस्तांतर करु नये असा अर्ज सादर केला आहे. कर्मचाऱ्यांनी कॉलेज हस्तांतर करु नये असे लेखी निवेदन सादर केले आहे. त्याची प्रत देणे तसेच परिशिष्ट १ ची प्रत देणे. आमसभेची ठरावाची संस्थेच्या (ठरावाची ) प्रत देणे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले

... २

आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी सदर बाब शाळा/संस्था स्तरावरील असल्यामुळे व शाळा/संस्था यांना माहितीचा अधिकार लागू असल्यामुळे आपण माहितीच्या अधिकाराअंतर्गत संबंधित शाळा/संस्था यांचेकडून वरील माहिती प्राप्त करुन घ्यावी व सदरच्या पत्राची प्रत प्राचार्य, वसंतप्रकाश उर्दु कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर यांना दिलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व अपीलकर्ता यांना कळविलेले असल्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही असा खुलासा दाखल करण्यात आलेला आहे. तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. आज संबंधित मुख्याध्यापक हे उपस्थित झाले आहेत त्यांनी असे सांगितले की, माहितीचा अर्ज त्यांना मिळाला नाही व माहिती तयार आहे ती संपूर्ण माहिती मी देण्यास तयार आहे. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १४.३.२००८ च्या अर्जामधील माहिती ३ दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व तशी पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ६.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६५७- १६५८/६.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६२५/२००८.

श्री. धनंजय अ. धाबे,
२४७, बजाजनगर,
नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सिटीझन एज्युकेशन सोसायटी,
क्रिडा चौक, ईश्वर देशमुख परिसर,
हनुमाननगर, नागपूर - ४४० ००९.

जनमाहिती अधिकारी तथा
सिटीझन एज्युकेशन सोसायटी,
क्रिडा चौक, ईश्वर देशमुख परिसर,
हनुमाननगर, नागपूर - ४४० ००९. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे तर्फे श्री. पी. पी. ठाकरे, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी सिटीझन एज्युकेशन सोसायटी, नागपूर यांचेकडे No grant Basis Courses (a) B.P.E. three years, (b) M.P.Ed. Two years (Regular) Separate list of Information required is enclosed as Appendix I त्यात एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने संस्थेने अपीलकर्ता यांना दिनांक २५.४.२००८ रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००८ रोजी पुन्हा संस्थेकडे अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

... २

३. अपीलकर्ता स्वतः हजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. प्रशांत पी. ठाकरे, वकील हजर असून त्यांनी युक्तिवाद केला व त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांना दिनांक ३.५.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच सदरची माहिती ही मोघम व माहितीचा कालावधी दिलेला नाही तसेच कोणत्याही प्रकारची तारीख दिलेली नाही त्यामुळे त्यांना सुरुवातीला स्पष्टीकरण करावे असे म्हटले आहे व या स्पष्टीकरण केल्यामुळे त्यांना ७ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती आयोगाने दिनांक ४.४.२००९ रोजी द्वितीय अपीलाची नोटीस काढल्यानंतर दिनांक ३.५.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६२४/२००८.

कु. पंचफुला मारोती बागडे,
द्वारा - डब्ल्यू. एस. बोरकर गुरुजी,
बब्बा भवनच्या समोर, चांदा लाईन जवळ,
श्रीनगर, गोंदिया. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्रीमती ममता झा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एम. एस. बारस्कर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३.५.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे अर्जदारास कामावर घेण्याबाबत दिनांक १८.५.२००७ ते दिनांक १८.७.२००७ च्या आपल्या कार्यालयीन आदेशानुसार यासोबत अर्जदाराचा अधिक माहितीचे वर्णन सह दोन मुद्यांमध्ये अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे श्री. जी. पी. मेश्राम ऐवजी कामावर का रुजू करण्यात आले नाही अशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती ही संस्थेचे स्तरावर असल्यामुळे अर्ज हा दिनांक ९.५.२००८

... २

रोजी मुख्याध्यापक यांचेकडे पाठविण्यात आला होता व त्याप्रमाणे अपीलकर्ती यांना दिनांक ७.६.२००८ रोजी मुख्याध्यापक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दिनांक ३१.५.२००८ रोजी सुध्दा शिक्षणाधिकारी यांना सदरचा अर्जाचे संदर्भामध्ये कळविण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे दिनांक ९.६.२००८ रोजी प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ती यांनी कामावर घेण्याबाबत विनंती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे मान्य करता येत नाही. मात्र त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांची विनंती मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६६१- १६६२/६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६४०/२००८.**

श्री. पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे,
नविन बसस्टॉप समोर, कॉजीवार्ड,
ता.हिंगणघाट, जि. वर्धा - ४४२ ३०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. एच. सुसतकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. व्ही. एस. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
ठाणेदार, पोलीस स्टेशन,
समुद्रपूर, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००८ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन, समुद्रपूर, जि. वर्धा यांचेकडे दिनांक २७.१०.२००३ ला अर्जदाराने तलाठी वाघाडे सजा क्र. ३१ तास यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीवर कोणती कार्यवाही केली आहे याबाबतची लेखी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जदाराचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना सुचना पत्र दिनांक २३.४.२००८ रोजी सदर तारखेस गैरअर्जदार विरुध्द पोलीस स्टेशनला कोणत्याही प्रकारची

... २

रिपोर्टची नोंद नाही. तसेच गैरअर्जदार विरुध्द दाखलपात्र, अदाखल पात्र गुन्हाची नोंद नाही. परंतु सदरचे सुचना पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही अशी तक्रार त्यांनी दिनांक १३.६.२००८ रोजी केलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २५.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर अपीलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे दिनांक २३.१०.२००३ व दिनांक २७.१०.२००३ चे पोलीस स्टेशन समुद्रपूरच्या अभिलेख पडताळणीनुसार आपण वरील तारखेस तलाठी श्री.अशोक वाघाडे यांचे विरुध्द आपण तक्रार दिल्याचे नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची नोंद नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. व्दितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अर्जदार श्री. पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे यांनी दिनांक २६.३.२००८ रोजी पोलीस स्टेशन, समुद्रपूर येथे माहितीच्या अधिकार अंतर्गत अर्ज दिला व दिनांक २७.१०.२००३ रोजी त्यांनी तलाठी वाघाडे यांच्या विरुध्द केलेल्या लेखी रिपोर्टवर कोणती कारवाई केली आहे. याबाबत माहिती नोंदणीकृत टपालाने मिळावे अशी विनंती केली. सदर माहितीची पुर्तता करण्याकरिता पोलीस स्टेशन, समुद्रपूर येथील पोलीस हवालदार, गजानन कौरथी, ब.नं. ८३३ यांनी अभिलेख पडताळणी केली व त्यानुसार दिनांक २७.१०.२००३ रोजी तलाठी अशोक वाघाडे यांच्या विरुध्द कोणत्याही तक्रारीची नोंद नाही असे पत्र पोलीस हवालदार गजानन यांनी तयार करुन दिनांक २३.४.२००८ रोजी प्रत्यक्ष अर्जदार श्री. पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे यांना दिले असता त्यांनी माहितीपत्र घेण्यास टाळून माझे जवळ गैरअर्जदार विरुध्द दिलेल्या रिपोर्टची पोचपावती पोलीस स्टेशन मधून मिळाली होती. ती हाजर करीन, पावती पाहून माहितीपत्र तयार करा व नंतर द्या असे म्हटले व निघून गेले. त्यानंतर अर्जदार यांनी पोच पावती हजर केली नाही आणि दिनांक १३.६.२००८ रोजी पोलीस स्टेशन, समुद्रपूर येथे माहितीच्या अधिकाराखाली मागविलेली माहिती अद्याप प्राप्त झाली नाही असे स्मरणपत्र दिले. त्याच दिवशी पोलीस स्टेशन, समुद्रपूर येथील ना.पो.कॉ. दिनेश बागडी ब.नं. ४३५ हे अर्जदाराने मागविलेली माहिती देण्यास गेले असता अर्जदाराने माहितीचे पत्र घेतले नाही व माहिती उपविभागीय अधिकारी यांचेकडून मागितली आहे. आता ते मला माहिती देणार तुमचे पत्र घेत नाही. असे म्हणून परत पाठविले. दिनांक २६.६.२००८ रोजी आमचे कार्यालयात यातील अर्जदारांनी अपील केले की, त्यांने

... ३

माहितीच्या अधिकारांतर्गत पोलीस स्टेशन, समुद्रपूर यांचेकडून मागितलेली माहिती त्यास देण्यास आली नसल्याने ती दयावी व पोलीस स्टेशन, समुद्रपूर येथील ठाणेदार यांचेवर कार्यवाही करावी. अर्जदाराची अपील नंतर त्यास दिनांक २१.७.२००८ रोजी त्यांनी मागविलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदर प्रकरणात पोलीस स्टेशन, समुद्रपूर यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु अर्जदार यांनीच ते घेण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणे पोलीस स्टेशन स्तरावर स.पो.नि. श्री. आर. टी. शेटे यांनी व उपविभागीय अपील स्तरावर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय देशपांडे यांनी हाताळली आहे. खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी न केलेल्या तक्रार बद्यलची माहिती मागितलेली दिसून येते व त्याप्रमाणे त्यांना कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६६३- १६६५/७.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६४८/२००८.**

श्री. अशोक बाबुराव शिरभाते,
प्लॉट नं. ७८, मोतीलाल नगर,
संपदा कॉन्व्हेंटचे बाजुला, गोन्ही सीम,
नविन दिघोरी नाका, उमरेड रोड,
नागपूर - ४४० ०२३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
नागपूर ग्रामीण, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय)
नागपूर ग्रामीण, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, मुख्यालय, नागपूर ग्रामीण, नागपूर हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही व उत्तरवादी तर्फे कोणीही हजर झाले नाहीत. अपीलाचे अनुषंगाने दिनांक १३.४.२००९ रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटीस निर्गमित केलेली आहे व त्यामुळे उत्तरवादी यांनी आज हजर राहणे आवश्यक होते.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००८ रोजी सन २००३ ते सन २००८ पर्यंत अर्जदाराच्या गोपनीय शीटमध्ये (सेवापटात) पोलीस स्टेशन अधिकारी, वेलतूर यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात अर्जदाराबाबत लिहिलेल्या

... २

सेवा अभिलेख (अभिप्राय) ची साक्षांकित छायाप्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.४.२००८ रोजी पोलीस उपअधिक्षक यांनी अधिनियमाचे कलम ८ पोटकलम (छ) (त्र) नुसार आपला अर्ज फेटाळण्यात येत आहे असे उत्तर दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे प्रथम अपील दिनांक २६.५.२००८ रोजी दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.६.२००८ रोजी सुनावणीस हजर राहावे असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक २६.५.२००८ रोजीचे सदरचे अपील मागे घेत आहे अशा प्रकारचा अर्ज पोलीस अधिक्षक, नागपूर यांना दिलेला दिसून येतो. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्या द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अपीलकारास नौकरीतून बडतर्फ करण्याची धमकी देऊन यापुढे कोणतीही माहिती मागू नये व नौकरी करायची असेल तर माझे समाधान झाले आहे व मी अर्ज मागे घेत आहो असे लिहून देण्यास अपीलकारास भाग पाडल्याने अपीलकाराने संकट टळावे करिता असे लिहून दिले त्याची प्रत सोबत जोडली आहे. परंतु याप्रमाणे अपीलकारास माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे बुध्दीपुरस्पर टाळले असून प्रथम अपीलीय अधिकारी श्री. यशस्वी यादव (भा. पो. से.) यांनी अपीलकारास स्वतः पदाचा दुरुपयोग करुन अपीलकारास माहिती देण्याचे टाळले व अपीलकारास धमकी दिल्याने अपीलकार व्यथित होऊन न्यायार्थ आपणाकडे अपील करतो आहे अशी विनंती केलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांचे विरुध्द जे आरोप केलेले आहेत ते अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत व त्या आरोपाची चौकशी होणे आवश्यक आहे व असे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती गोपनीय अहवाल आहे व गोपनीय अहवालाची वस्तुस्थिती कर्मचाऱ्यांस कळविणे आवश्यक असले तरी सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिष्टर पोष्टाने कळविण्यात यावे. तसे न केल्यास संबंधित जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत विशेष पोलीस महासंचालक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी. तसेच विशेष पोलीस महासंचालक यांनी आयोगापुढे सुनावणीस उत्तरवादी हजर नसल्यामुळे त्यांना समज देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५१/२००८.**

श्री. सुधीर मनोहरराव डांगे,
प्लॉट नं. २१, पुर्व रेणुका मातानगर,
हुडकेश्वर रोड, नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती इंदूमती परतेकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. लांजेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गायत्री विद्यालय, गायत्रीनगर, नागपूर यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेंणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अर्जदारास दिनांक ११.८.२००८ रोजी माहिती पुरविण्यात यावी असे निर्देश मुख्याध्यापक याना देण्यात आले होते असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाले आहेत व जनमाहिती अधिकारी किंवा मुख्याध्यापक आज शाळेमध्ये नाही. तसेच शाळेतील लिपिक संस्थेचे अध्यक्ष आहेत व त्यांचेकडे संपूर्ण कागदपत्रे आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले असले तरी संबंधित संस्थेने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व आज जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गायत्री विद्यालय, नागपूर हे पद रिक्त असल्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संबंधिता विरुध्द योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.६.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश संस्थेतील तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी पालन केले नसल्यामुळे संस्थे विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची नोंद जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गायत्री विद्यालय, नागपूर यांनी घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ८.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६६९- १६७०/८.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५३/२००८.**

श्री. हरिचंद्र चिंधुजी भगत,
द्वारा - कोठारी कॅसेट सेंटर,
गोपालनगर, मेन रोड,
३ रा बस स्टॉप जवळ,
प्रतापनगर, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती इंदूमती परतेकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. लांजेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे खालील विषयावर महाराष्ट्र शासनाने चित्रकला या विषयाच्या विशेष शिक्षकासाठी दिनांक ३० जुलै १९८० नुसार निर्णय पारित केला आहे. शासन निर्णय क्रमांक Government of Maharashtra, Education and Employment Department Resolation No.C.A.C. १०७९/८८३/XXX-XXVII, Mantralaya, Annex, Bombay-३२, Dated ३०th July १९८० या

... २

निर्णयानुसार मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे क्रमांक : अमाशा/३०८५/१३७००/क, शिक्षण संचालनालय, पुणे दिनांक ६.९.१९८५ अन्वये सदर शासन निर्णय प्रचलित असल्यामुळे. त्यात एकूण १४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १९.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १०.७.२००८ रोजी झाली व अर्जदाराच्या अर्जातील माहिती दिनांक १८.७.२००८ पर्यंत पुरविण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही या कारणासाठी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना अर्जदाराने एकूण १४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. माहिती किचकट होती. प्रश्नार्थक स्वरुपात होती. कोणत्या पत्राची प्रत पाहिजे हे कळू शकले नाही. त्यामुळे माहिती पुरविता आली नाही. असा खुलासा दाखल केलेला आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगाकडे खालील प्रमाणे निवेदन दाखल केलेले आहे. श्री. ह. चि. भगत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ जोडपत्र अ मध्ये मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत पुरविण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी या कार्यालयाकडे दिनांक १९.६.२००८ रोजी अपील दाखल केले होते. त्यासंदर्भात या कार्यालयात दिनांक १०.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान दिनांक १८.७.२००८ पर्यंत अर्जदारास माहिती पुरविण्यात यावी असा निर्णय देण्यात आला होता. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये आय.एस.ओ. प्रमाणपत्र ९००१-२००० मिळण्यासाठी दिलेल्या निर्देशानुसार कार्यालयाची साफसफाई, डागडुजी व नस्त्यांचे वर्गीकरण करणे इत्यादी कामे हाती घेण्यात आली होती. सदर कामे तब्बल १ महिनाभर चालली. या कालावधीत कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व्यस्त असल्यामुळे श्री. ह. चि. भगत यांचे अर्जावर नजर चुकीने कार्यवाही करावयाची राहून गेले. अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १० दिवसात पुरविण्यात येईल. तरी आपणास विनंती करण्यात येते की, अर्जदारास माहिती पुरविण्याकरिता या कार्यालयास कृपया १० दिवसांचा कालावधी देण्यांत यावा ही विनंती. श्री. ह. चि. भगत यांचेबाबत असेही आपले निदर्शनास आणून देण्यात येते की, त्यांनी अनेक वेळा माहितीचे अधिकारात अर्ज करुन २५% शिक्षक संदर्भात माहिती मागितलेली आहे. त्यांना

... ३

वेळोवेळी माहिती सुध्दा पुरविलेली आहे. तरी सुध्दा एकच-एक माहिती माहितीचे अधिकारात वारंवार शब्दांची फेरफार करुन मागितली जाते. एकंदरीत श्री. ह. चि. भगत हे माहितीचे अधिकाराचा दुरुपयोग करुन अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना वेठणीस धरण्याचा प्रयत्न करतात असे निदर्शनास येते. श्री. भगत यांनी अनेक प्राधिकरणाकडे तक्रार केली आहे. त्यांनी सहाय्यक पोलीस निरिक्षक (नागरी हक्क) संरक्षण केंद्र, नागपूर यांचेकडे दिनांक १६.५.२००५ ला या कार्यालयाचे संबंधाने तक्रार केली होती. त्यांची तक्रार चौकशी अंति खारीज करण्यात आली आहे. त्यांना अतिरिक्त ठरविल्या प्रकरणी मा.न्यायालयाने रिट याचिका क्रमांक १२१५/०९ मध्ये दिनांक २३.३.२००९ ला निर्णय देऊन त्यांची अपील खारीज केलेली आहे. तसेच मा.शिक्षण उपसंचालक यांनी सुध्दा वेळोवेळी सुनावणी घेऊन निर्णय दिलेले आहेत. तरीही श्री. भगत यांचे समाधान होत नाही याला या कार्यालयाचा नाईलाज आहे. सदर बाब आपले निदर्शनास आणून देण्यात येत आहे. कृपया योग्य निर्णय देण्यात यावा ही नम्र विनंती. जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निवेदन यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी एकुण १४ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे ती माहिती अभिप्रायात्मक प्रश्नाचे स्वरुपात आहे. प्रत्यक्ष अपीलकर्ता यांचे अर्जातील एकूण १४ मुद्याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे अभिमत मागितलेले दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील साहित्याचे स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती उदा.:- अभिलेख, दस्तऐवज कागदपत्रे टिप्पणी इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारचे अभिप्राय किंवा अभिमत हे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज हा माहितीच्या अधिकाराच्या तरतुदीप्रमाणे नाही. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तशा प्रकारचा निर्णय देणे आवश्यक होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा अपीलाची सुनावणी न करता व वाचन न करता निर्णय देत असतात. त्यामुळे अपीलकर्ता हे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निवेदन दाखल केलेले आहे त्या निवेदनामध्ये अपीलकर्ता हे तीच ती माहिती मागत असतात व माहितीचा अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत असेही त्यांचे निवेदनात असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ८.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५२/२००८.

श्री. शेषराव सुदामजी रोकडे,
१३२, सम्यकनगर, नारी रोड,
नागपूर - ४४० ०२६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती इंदूमती परतेकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. लांजेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर तथा माहिती अधिकारी यांचेकडे २ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.८.२००८ ला देण्यात आला असून संबंधित लिपिकाकडून माहिती ८ दिवसात उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. परंतु तत्पुर्वीच दिनांक १७.५.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात आली अशा प्रकारचे पत्र हे सादर करण्यात आलेले

... २

आहे व रजिष्टरमध्ये उल्लेख केलेला आहे. मात्र प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुनावणीचे वेळेस माहिती देण्यात आली याबद्यलचा उल्लेख दिसून येत नाही. अन्यथा संबंधित लिपिकाकडून ८ दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असा खुलासा दाखल झालेला नसता. असे असले तरी आज अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी माहिती मिळालेली आहे ती मोघम माहिती असल्यामुळे त्याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली आहे. अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचे दिनांक १६.२.२००८ च्या अर्जातून मागितलेली माहितीचे स्पष्टीकरण अपीलकर्ता यांना देऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ८.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६७५- १६७६/८.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६२/२००८.

श्री. अनिल वासुदेवराव कोलप्याकवार,
रा. बाजार चौक, मु. पो. ता. सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक,
एफ.डी.सी.एम. लिमिटेड,
ब्रम्हपूरी वन प्रकल्प विभाग,
जिल्हा चंद्रपूर.

श्री. एस. बी. खैरनार,
जनमाहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनविकास महामंडळ,
वन परिक्षेत्र सिंदेवाही,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन विकास महामंडळ, वन परिक्षेत्र सिंदेवाही यांचेकडे इमारती लाकुड कटाई, जलाऊ बिट तयार करणे, वाहतुक दर संबंधी सन २००३ ते आज पर्यंत माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००८ रोजी प्रथम अपील

... २

दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये दिनांक १७.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता संपर्क साधावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलबध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, वन परिक्षेत्र अधिकारी हे माहिती अधिकारी नाहीत. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००८ रोजी रेंज फॉरेस्ट ऑफीसर, सिंदेवाही यांनी माहितीचे अवलोकन करुन आवश्यक दस्ताऐवजांची यादी तयार करुन आवश्यक प्रतीची प्रत्येक प्रतीची दोन रुपये याप्रमाणे रक्कमेचा भरणा चालान द्वारे विभागीय कार्यालयास सादर केल्यानंतर आवश्यक माहिती बाबतचे दस्ताऐवज पुरवठा करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक २७.६.२००८ रोजी पुन्हा रेंज फॉरेस्ट ऑफीसर यांनी दिनांक २२.४.२००८ चे अन्वये मागितलेली माहिती ही व्यक्तिशः मागितली असून मागितलेली माहिती सिंदेवाही वनपरिक्षेत्र कार्यालयात उपलब्ध असून ती व्यक्तिशः घेण्याकरिता आपण स्वतः दिनांक ९.७.२००८ ते १०.७.२००८ पावेतो सकाळी १०.०० ते १४.०० यावेळेत उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे दिनांक २८.६.२००८ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी पत्र दिलेले दिसून येते. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी हे माहिती अधिकारी नाहीत असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाची दिशाभूल केलेली दिसून येते. कारण तसे नसते तर दिनांक २५.६.२००८ रोजी तत्कालीन रेंज फॉरेस्ट ऑफीसर यांनी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अर्ज केल्या त्यावेळेस वनपरिक्षेत्र अधिकारी हेच माहिती अधिकारी होते. त्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी अर्ज केलेला आहे असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली दिनांक २२.४.२००८ व दिनांक १२.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्येच विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व जी माहिती अंदाजपत्रकाचे स्वरुपात, स्किम इस्टीमेटच्या

... ३

स्वरुपात आहे ती माहिती अपीलकर्ता यांना अभिलेखाची प्रत्यक्ष नोंद करुन उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे च त्यांच्या अधिकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाची सुध्दा दिशाभूल जनमाहिती अधिकारी तसेच विभागीय व्यवस्थापक व प्रथम अपीलीय अधिकारी करतात असे दिसून येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.४.२००८ व दिनांक १२.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत ही माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध आहे त्यांच्या छायांकित प्रती व जी माहिती व्यापक प्रमाणत आहे ती माहिती ही अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष निरिक्षण करुन आवश्यक असलेल्या त्या कागदपत्रांची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव, वने, मंत्रालय, मुंबई यांचेकडे स्वतंत्रपणे माहितीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६७७- १६७९/११.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७२/२००८.

श्री. महेश चैतराम पाली,
३६६, टॉगा स्टॅन्ड, धरमपेठ,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कामठी, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. मतमोजणीच्या कामाचे प्रशिक्षणामध्ये व वैद्यकीय सेवा प्रवेश परिक्षांचे प्रशिक्षण असल्यामुळे मुदत मिळावी अशी विनंती केलेली आहे. परंतु कागदपत्रे दाखल केलेली असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणीनंतर माहिती उपलब्ध झाली असे आयोगास सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ११.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६८०/११.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७१/२००८.

श्री. शंकर के. पंगट्टीवार,
मेघराज चाल, गांधी चौक,
सदर, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी गैरहजर आहेत. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. मतमोजणीच्या कामाचे प्रशिक्षणामध्ये व वैद्यकीय सेवा प्रवेश परिक्षांचे प्रशिक्षण असल्यामुळे मुदत मिळावी अशी विनंती केलेली आहे. परंतु कागदपत्रे दाखल केलेली असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी तथा माहिती अधिकारी, नागपूर यांचे order passed by S.D.O. Nagpur order in Land R.C.No. ७७/LND/१८/२०००-२००१ सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.४.२००८ रोजी सदर प्रकरणाचा शोध घेण्यात आला परंतु अद्याप प्रकरणाचा शोध लागलेला नाही. प्रकरणाचा शोध लागताच आपणास आदेश पत्राची प्रत घेऊन जाण्याबाबत सुचित करण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते.

... २

परंतु अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळत नसल्यामुळे दिनांक ११.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.४.२००८ रोजी दिलेला दिसून येतो व त्यात अपीलार्थीस पाहिजे असलेल्या प्रकरणाचा शोध घेणे व प्रकरणाचा शोध लागल्यावर अर्जातील मागणीनुसार माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी प्रकरणाचा शोध घेत आहेत व प्रकरण सापडल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. परंतु त्यानंतर कोणत्याही प्रकारचा शोध घेण्याबद्यल प्रयत्न केलेले आहेत असे प्रथम अपीलाचे सुनावणीत दिसून आले नाही. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा कोणत्याही प्रकारचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसून येत नाही किंवा जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा तसा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणाचा शोध घेतला जात नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरिता संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रकरणाचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.३.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी. तशी उपलब्ध करुन न दिल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ११.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६८१- १६८२/११.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७०/२००८.**

सौ. डॉ. सुवर्णा गंगाधर डायगव्हाणे,
१/१, एन.आय.टी. कॉलनी, अत्रे ले आऊट,
प्रतापनगर, नागपूर. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

श्री. सुभाष बेलसरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. While constituting the selection committee for the selection of a affiliated college teacher, an expert who is appointed as Vice-Chancellor's nominee requires which qualification ? or what qualification should be possessed by him ? Kindly give me the aforesaid information at the earliest and shall collect

... २

the information personally. I hope you shall do the needful and oblige. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.४.२००८ रोजी अतिरिक्त खर्चाकरिता रुपये ४/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.६.२००८ रोजी देण्यात आला असून कुलसचिव व माहिती अधिकारी यांनी निर्धारित कालावधीत अर्जदाराला माहिती पुरविण्याबाबतची सुचना पाठविल्याचे आणि अर्जदाराने माहिती प्राप्त करुन घेण्याचे निदर्शनास येत असल्यामुळे दाखल अपील खारिज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे असे कारण दिलेले आहे. अपीलकर्ती यांनी तोंडी युक्तिवाद करतांना असे सांगितले की त्यांनी समितीवर नियुक्त करण्यात येत असलेल्या सदस्यांची अर्हता मागितलेली होती. परंतु वर जनमाहिती अधिकारी यांनी विद्यापीठ निर्देश क्र. ७/१९९९ मधील परिशिष्ट ८ मधील ४(१) वाचून दाखविला व त्यावरुन अपीलकर्ती यांनी मागितलेली माहिती व दिलेली माहिती हे योग्य आहे असे दिसून येते. अपीलकर्ती यांची तक्रार अशी दिसून येते की, ज्या व्यक्तिंची उपकुलगुरु यांची नियुक्ती केली ती व्यक्ति तदर्थ शिक्षक असल्यामुळे ती अर्हता प्राप्त करीत नाही व त्यामुळे त्यांची जी नियुक्ती आहे ती नियमाप्रमाणे नाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये हस्तक्षेप करता येत नाही व माहिती ही जशी आहे तशी अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज या स्वरुपात मिळते. उपलब्ध माहितीचे आधारे निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करणे हा पर्याय आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती योग्य आहे व ती मुदतीत उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ११.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६८/२००८ व अपील क्रमांक ६६९/२००८.**

श्री. पुरुषोत्तम पांडुरंग ईखार,
बाजार चौक, स्टेशन रोड,
ढोले सायकल स्टोअर्सचे मागे,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. मेघना वा. वासनकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कळमेश्वर,
जि. नागपूर.

श्री. गजानन महादेवराव दुर्गे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी कर निरिक्षक,
नगर परिषद, कळमेश्वर,
जि. नागपूर.

श्री. जितेंद्र हिरुळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता, (बांधकाम)
नगर परिषद कळमेश्वर,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ११.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२.	अपील क्रमांक ६६८/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमेश्वर यांचेकडे श्री. पांडुरंग बालाजी ईखार यांचे नावावर असणाऱ्या घराचा सन १९११-१२ चा अभिलेख. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.६.२००८ रोजी आपण विषयांकित अर्जान्वये श्री.पांडूरंग बालाली ईखार यांच्या नावावर असलेल्या घराचा सन १९११-१२ चा अभिलेख मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. नगरपरिषद हद्यीतील मालमत्ता धारकावर नगरपरिषद सन १९७०-७१ पर्यंत हैसियत टॅक्सची आकारणी करीत होती आणि सन १९७१-७२ पासून मालमत्ता धारकावर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत असून आपण मागितलेल्या सन १९११-१२ च्या अभिलेखाच्या अनुषंगाने हैसीयत टॅक्सचा रेकॉर्ड या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांच्या राहत्या घराचा वाद सुरु आहे व त्यांना सदरची जागा घेण्याकरिता आहे ही माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता त्यांना सन १९११-१२ या कालावधीतील अभिलेखाची आवश्यकता आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नगरपरिषदमध्ये सदरची माहिती उपलब्ध नाही व त्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांच्या घराचे संदर्भामध्ये जो वाद उत्पन्न झाला आहे तो वाद हा शेजाऱ्यांच्या जागे संदर्भात आहे व त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित कर लिपिक हे त्यांच्या शेजाऱ्यांचे नातेवाईक आहेत व त्यामुळे ते कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर संबंधित लिपिक तसे नाही असे सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या घराचे मालमत्तेच्यासंदर्भामध्ये नगरपरिषदेतील मिळकत व्यवस्थापन किंवा संबंधित कार्यालयातील अभिलेख सुध्दा पाहणी करुन माहिती उपलब्ध असल्यास ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

४.	अपील क्रमांक ६६९/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, कळमेश्वर यांचेकडे २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये मुख्याधिकारी यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांनी केलेल्या अपीलाचे अनुषंगाने माहिती अधिकारी, नगरपरिषद, बांधकाम विभाग, कळमेश्वर यांच्याकडे अपीलाचे अनुषंगाने माहिती घेतली असता माहिती तयार करण्यात आली असून अपीलकर्त्यांना रक्कम भरण्याचे पत्र दिले असता अपीलकर्ता यांनी रोखपालकडे जाऊन रक्कम भरली. रक्कम भरल्यानंतर संबंधित विभागाशी संपर्क न साधता परस्पर निघुन गेले. त्यामुळे अपीलकर्त्यांनी रक्कम भरली किंवा नाही याची खात्री न पटल्यामुळे तयार करण्यात आलेली माहिती पाठविता आली नाही. अपीलकर्ता यांनी सर्व माहिती घेण्यास स्पष्ट नकार दिला व त्यांनी सदर माहिती माझे घरपोच पाठवावी असे सांगितले व त्याप्रमाणे अपीलीय अधिकारी यांनी घरपोच माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिल्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु अपीलकर्ता यांनीच विलंब केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे त्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५.	अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती मिळाली. परंतु मुद्या क्रमांक २ मध्ये चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, कार्यालयीन टिपणी हेच चौकशी अहवाल आहे व ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्या कार्यालयातील टिपणी हस्ताक्षरामध्ये असल्यामुळे त्यातून काहीही बोध होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरिता अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.२.२००३ च्या अर्जाप्रमाणे चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६६८/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये नगरपरिषदेतील मालमत्ता कराचे संदर्भातील तसेच मालमत्ता हैसियत शाखेतील कागदपत्रांची पाहणी करुन आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना दोन्ही शाखेमधील अभिलेख निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी. सोबत नगरपरिषदेंचा कर्मचारी असणे आवश्यक आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६६९/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २३.५.२००८ च्या अर्जातील दिनांक ७ फेब्रुवारी, १९ मार्च, १६ एप्रिल, ५ मे २००४ दिलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये चौकशी करुन हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी हे तक्रार आल्यास शास्तीस पात्र राहतील.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळमेश्वर, जिल्हा नागपूर यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६८६- १६८९/११.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७८/२००८.

श्री. मोरेश्वर रामचंद्र घरत,
उपगन्लावार ले आऊट,
गुरुद्वार रोड, दे. गो. तुकुम,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर.

श्री. पी. व्ही. ठोपकस,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, चंद्रपूर यांचेकडे सेवाविषयक बाबीबाबत दिनांक १६.९.२००१ ते दिनांक ३०.९.२००१ या कालावधीतील एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.	द्वितीय अपीलाचे सुनावणीसाठी दिनांक १३.४.२००९ रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढण्यास आलेली आहे. परंतु तहसीलदार, चंद्रपूर यांचे कार्यालयातून जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे हजर झाले मात्र उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयातून कोणीही उपस्थित झाले नाही किंवा कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध कां करुन देण्यात आली नाही या बद्यल जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, या कार्यालयातील लिपिक हे सतत आजारी होते व त्यात त्यांच्या मृत्यु झाला व त्यामुळे त्यांचा अर्ज आढळून आला नाही. मात्र अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, माहिती २००१ ची असून ती सतत मागत आहेत ती तरीही सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलाचे बाबत सुध्दा कोणत्याही प्रकारची सुनावणी किंवा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी आता पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा राज्य माहिती आयोगाचे कार्यालयास दाखल केलेला आहे. श्री. मोरेश्वर रामचंद्र घरत, शासकीय कर्मचारी यांचा दिनांक १६.९.२००१ पासून दिनांक ३०.९.२००१ पर्यंत एकूण १५ दिवसाच्या सुट्टीचे वेतनासंबंधीचा प्रश्न उपस्थित करतांना तो त्यांना सवितरण केले आहे काय ? याबाबत राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपुर यांचे ज्ञापन क्र.जावक रामाआ/अपील/१८१७/०९, दिनांक १३.४.२००९ यांच्या संदर्भात त्यांना असे कळवण्याचा मला आदेश आहे की, मी पुढील गोष्टी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. मुद्या क्रमांक १ :- उक्त कर्मचारी हे उक्त कालावधीत रजेवर होते ही बाब सत्य असली तरी यासंबंधात आस्थापना शाखेत पूर्वी कार्य करणारा कर्मचारी श्री. किशोर भोगेकर यांचेशी विचारणा केले असता त्यांनी दिलेल्या मौखीक माहितीच्या आधारे रजा संपल्यानंतर उक्त कर्मचारी आपल्या पदावर पूर्ववत रुजू होतांना माजी तहसीलदार श्री. खांडरे साहेबांनी श्री. मोरेश्वर घरत यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांना असे सुचित केले की, त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ यातील नियम ४०, ४१, ४७ मधील तरतुदीनुसार नमूना-४ व नमुना-५ मध्ये माहिती सादर करण्यास सांगतांना रुग्णांनी विकत आणलेली औषधी याची रोख टिपण पावती आणावी. परंतु त्यांनी आजपर्यंत या कार्यालयास सादर केले नाहीत. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ यातील नियम १० मधील तरतुदीनुसार रजा हक्क म्हणून मागता येत नाही आणि तसेच उक्त नियमातील नियम ३३ मधील तरतुदीनुसार वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले म्हणून अनुज्ञेय नसणारी कोणतीही रजा हक्काने मागण्याचा पुरावा म्हणून मानली जाणार नाही. असे असले तरी त्यांनी या दिर्घकाळा

नंतरही उक्त बाबी पूर्ण केल्यास उक्त कालावधीची रजेच्या संबंधात अंतीम निर्णयाचा विचार करता येईल असे या कार्यालयाचे मत आहे. मुद्या क्रमांक २ :- अपीलकर्ता हे स्वतः शासकीय कर्मचारी आहेत. वास्तविक पहाता कर्मचारी यांनी स्वतःच्या सेवाशर्ती संबंधी तसेच सेवापुस्तक संबंधात कार्यालय प्रमुख यांनी दखल न घेतल्यास मा.प्रांत अधिकारी, त्यानंतर मा जिल्हाधिकारी आणि तसेच त्यानंतर मा.आयुक्त यांचेकडे तक्रार करता येऊ शकत असते. परंतु त्यांनी तसा कोणताही प्रयत्न करतांना या कार्यालयास दिसून आले नाही. असा कोणताही प्रयत्न न करता माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविणे हा महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ यातील नियम ३ मधील तरतुदींचा भंग करण्याचा प्रकार आहे. यापूर्वी देखील अर्जदाराकडून माहितीच्या अधिकाराखाली उक्त माहिती मागवण्याचा प्रकार घडला आहे. आकस ठेऊन कोणतीही कृती वा कार्यवाही होत असेल तर ती वाजवी, योग्य व कायदेशीर ठरत नाही. अशा प्रकरणी अर्ज फेटाळणेंच योग्य होईल असे या कार्यालयाचे मत आहे. तसेच अर्जदाराचे अभ्यावेदनाचा सुक्ष्म विचार करता त्यांनी प्रश्नाच्या स्वरुपात माहिती मागविली आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यातील परिच्छेद क्रमांक २३ यात विहित केल्याप्रमाणे या अधिनियमान्वये अपीलांद्वारे असेल त्या खेरीज असा आदेश प्रश्नास्पद करता येणार नाही. (No court shall entertain any suit, application or other proceeding in respect of any order made under this Act and no such order shall be called in question otherwise than by way of an appeal under this Act.) वास्तविक माहिती ही अपीलकर्ता अर्जदार यांनी मागितली आहे ती त्यांनी द्यावयाचे ऐवजी आयोगाकडे प्रक्रियेच्या गुणवत्तेबाबत खुलासा करणे याचा अर्थ तहसीलदार, चंद्रपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीची माहिती दिसून येत नाही. आयुक्त माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत चौकशी करतात. कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये आयुक्त माहिती मागवित नाही व त्यामुळे अपीलकर्ता अर्जदार यांना अजूनही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज जर सादर केलेला नसेल तर ही बाब त्यांच्या कार्यालयातील अकार्यक्षमतेची बाब आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे जबाबदार आहेत असा निष्कर्ष काढून त्यांचे विरुध्द शास्तीस पात्र आहेत व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची शिफारस करणे आवश्यक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांच्या दिनांक १५.११.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.११.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी करावयाची आहे व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांनी प्रथम अपीलाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले व शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना समज देण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १२.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६९०- १६९३/१२.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७४/२००८.

श्री. संतोष केशवराव बेंडले,
वार्ड क्रमांक १, दुर्गापूर,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. बी. वटी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००८ रोजी (प्राप्त दिनांक १२.०.२००८) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे अतिरिक्त जिल्हाधिकरी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे दुर्गापूरचे बाजाराकरिता जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २८.४.२००८ ला अर्जदाराने मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूरला सादर केलेले निवेदन जे की, त्यांचे रिमार्कसह त्याच दिवशी आपणाकडे सादर करण्यात आले आहे. त्याबाबत एकूण १४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती ही तहसीलदार, चंद्रपूर स्तरावरील असल्यामुळे दिनांक २३.६.२००८ रोजी उपविभागीय

... २

अधिकारी, चंद्रपूर यांनी तहसीलदार, चंद्रपूर यांचेकडे अहवाल मागविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त होताच आपणांस त्वरित माहिती पुरविण्यात येईल असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १.७.२००८ रोजी तहसीलदार, चंद्रपूर यांनी उपविभागीय, चंद्रपूर यांना अहवाल पाठविलेला दिसून येतो. त्यावरुन दिनांक २.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २५.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.८.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती खाजगी जमीनीवरील अतिक्रमण आहे व सदरचे अतिक्रमण हे जिल्हाधिकारी कार्यालयाने हटवून द्यावे अशी अपीलकर्ता यांची अपेक्षा आहे. परंतु खाजगी जमीनीवरील अतिक्रमण हे शासनास हटविता येत नाही. त्यांनी वारंवार प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे असे अतिरिक्त जिल्हाधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले. माहिती ही तहसीलदार स्तरावरील असल्यामुळे त्यांचेकडून अहवाल मागितला होता व अहवाल विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही विलंबाने उपलब्ध झाली आहे. असे असले तरी माहिती करिता अपीलकर्ता यांना एकाच दिवसाचा विलंब लागलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती विचारलेली आहे ती अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १२.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**
**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६९४- १६९५/१२.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७००/२००८.**

श्री. गोकुल तुळशीराम ठवकर,
मु. चिखलाबोडी, पो. अडम,
ता. कुही, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. डब्ल्यू. कोडापे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर

श्री. व्ही. जी. कुभारे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भुमी अभिलेख, कुही,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असून उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक२६.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका भुमी अभिलेख, कुही यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. प.ह.न. ५६ मौजा चिखलाबोडी शिवार येथील भु.क्र. १२ ०.३४ हे.आर. सिमांकन करुन देण्याविषयी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १४.६.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांना वेळोवेळी नोटीस काढलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आले असे दिनांक २८.८.२००८ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. तरीही सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. ... २

३. द्वितीय अपीलाची सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास दिनांक ७.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात सिमांकन करुन देण्यात आलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६९६- १६९७/१५.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९९/२००८.

श्री. हरिश्चंद्र चिंधुजी भगत,
द्वारा - कोठारी कॅसेट सेंटर,
गोपालनगर, मेनरोड, ३ रा बसस्टॉपजवळ,
प्रतापनगर, नागपूर - ४४० ० २२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर असून उत्तरवादी तर्फे श्री. अ. म. लांजेवार, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही पंचीबध्द डाकेने मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यानंतरही माहिती उपलब्ध

... २

करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ५.७.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरची माहिती अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचे माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नागपूर जिल्हयातील सर्व शाळांची छायांकित प्रती हा अतिव्यापक प्रमाणात आहे. वास्तविक मागितलेल्या माहितीची प्रमाणित प्रत पृष्ठ रुपये २/- खर्च कळविणे जनमाहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक आहे. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याकरिता अतिरिक्त खर्चाची मागणी केली नसल्यामुळे सदरची कागदपत्रे कोणतीही व्यापक प्रमाणात असले तरी विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.५.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भातील माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तिशः हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तिशः संपर्क साधून सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी.

२) सदरच्या माहितीच्या संदर्भातील छायांकित प्रतीचा खर्च हा जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी स्वतः करावयाचा आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १५.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**
**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१६९८- १६९९/१५.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६६/२००८.**

श्री. समाधान शिवराम पोहरकर,
संताजीनगर, धर्मराज शाळेजवळ,
कांद्री (कन्हान), ता. पारशिवनी,
जि. नागपूर - ४४१ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. माधव झोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी ,
जिल्हा परिषद, नागपूर

श्री. ना. ग. संतापे,
जनमाहिती अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे राजीव मुकबधीर निवासी शाळा, कांद्री कन्हान येथील अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार संबंधित माहिती एकूण २० मुद्यांचे माध्यमातून मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध

... २

करुन दिलेली नाही. चौकशी अहवाल हा स्वयंपूर्ण नाही. त्यामुळे त्यांनी संपूर्ण अनियमिततेबद्यल कागदपत्रे असतील त्या सर्वच कागदपत्रांची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.३.२००८ च्या अर्जासोबत जोडलेल्या मुद्यांच्या संदर्भात मुद्येनिहाय माहिती कागदपत्राचे स्वरुपात हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या संस्थेमधील सर्व कागदपत्रे व अभिलेख यांचे निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांनी कळवून त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी व त्यातून निरिक्षण करुन आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १५.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७००- १७०१/१५.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७०१/२००८.**

श्री. देवराव नत्थुजी चटप,
२०, ओंकारनगर,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर

श्री. एस. आर. नेताम,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२ अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी जी. आर. नुसार वेतन निश्चिती करण्यात आली नाही याबाबत माहिती पाठविण्यात यावी. तसेच आपले कार्यालयाकडे दिनांक १२.५.२००८ रोजी अंडर पोस्टींग द्वारा मी विनंती अर्ज केला आहे. परंतु कारवाई काय झाली याबाबत माहिती समजली नाही म्हणून माहितीचा अधिकार २००५ माहिती मिळण्याकरिता सेवेशी विनंती अर्ज करीत आहे व त्यात एकूण ५ मुद्यांवर माहिती जनमाहिती अधिकारी म्हणून आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे मुद्यांतून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा केलेला दिसून येतो. श्री. डी. एन. चटप, से.नि.के.प्र.पं.स., नागपूर हल्ली मु. २० ओंकारनगर, पो. भगवाननगर, नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांनी त्यांचा अर्ज दिनांक १२.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी मा.आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर ला माहिती मिळण्याबाबत सादर केला. सदर अज्र उक्त कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्र) विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. ४८८/०८, दिनांक २७.६.२००८ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात आला. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. ८०८६/०८, दिनांक ७.७.२००८ अन्वये या कार्यालयास उक्त अर्ज दिनांक ९.७.२००८ ला प्राप्त झाला. त्यानुसार दिनांक १२.६.२००८ च्या श्री. चटप यांचे अर्जावर कार्यवाही करुन या कार्यालयाचे पत्र क्र. ५४६५/०८, दिनांक १९.७.२००८ नुसार श्री.चटप यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे. सुलभ संदर्भाकरिता उक्त पत्राची प्रत यासोबत संलग्न करण्यात आली आहे. कृपया अवलोकन व्हावे. तरी प्रकरणी वरील प्रमाणे मुद्येनिहाय सविस्तर अहवाल माहितीस सविनय सादर. परंतु खुलाश्यावरुन अपीलकर्ता यांना वेळोवेळी सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांना वेतनवाढ करुन पाहिजे आहे अशी विनंती त्यांनी द्वितीय अपीलात केलेली आहे. जनमाहिती अधिकारी याचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मा. लोकआयुक्त यांचेकडे सुध्दा अर्ज केला होता. न्यायालयात सुध्दा अर्ज केला होता. परंतु असे असून सुध्दा त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी तरी सुध्दा आपण सादर केलेल्या मागणीच्या अनुषंगाने नियमानुसार योग्य कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांना दिलेल्या आहेत. आपल्या मागणीनुसार वेतनवाढी संबंधातील प्रकरण हे सन १९६६ या वर्षाचे असून जवळपास ४० वर्षे पुर्वीचे असल्यामुळे त्यासंबंधाचे दस्ताऐवज शोधून योग्य तो निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना याबाबत संपूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७०२/२००८ व अपील क्रमांक ७०३/२००८.**

श्रीमती रत्नमाला मनोहर खोब्रागडे,
प्राध्यापक कॉलोनी, महात्मा फुले चौक,
नगिनाबाग, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
मधुबन प्लाझा, शिवाजीनगर,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल सोसायटी,
द्वारा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
रामनगर, चंद्रपूर.

डॉ. अजित देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण)
नागपूर विभाग, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
रामनगर, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. के. वरवाडे, वकील हे हजर आहेत.

... २

२. अपील क्रमांक ७०२/२००८ मध्ये अपीलकर्ती यांनी दिनांक २५.४.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ममोरियल सोसायटी, चंद्रपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आवक जावक रजिष्टर मधील नोंदी मिळण्याबाबत. १ जानेवारी १९९३ ते १ जानेवारी २००१ पर्यंत. १) खाली दर्शविलेल्या दिनांकाच्या प्रमाणित नोंदीचे उतारे देण्यात यावे. दिनांक २९ डिसेंबर १९९३ ते १ डिसेंबर २००० च्या सर्व नोंदी. २) दिनांक ५ नोव्हेंबर २००० ला संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव पारित करण्यांत आला त्या ठरावाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. सदरची माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. तीच माहिती त्यांनी दिनांक १२.३.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, चंद्रपूर यांचेकडे मागितलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये दिनांक २३.७.२००८ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत. परंतु प्रमाणित करुन दिलेली नाही. ती अपील क्रमांक ७०३/२००८ मध्ये दिसून येते. जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांचे तर्फे श्री. श्रावण वरवाडे हे सुनावणीचे वेळेत हजर झाले व त्यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ती यांच्या दिनांक २५.४.२००८ चा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त नाही व त्यामुळे माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असली तरी माहिती ही देता आली नाही व माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी आहे. वास्तविक राज्य माहिती आयोगाची नोटीस सोबत अपीलकर्ती यांचे त्यांच्या अर्जाची प्रत त्यांना उपलब्ध झाली होती व त्याच वेळेस अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते किंवा प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा अर्जाची प्रत देऊन माहिती उपलब्ध करुन देता आली असती. परंतु अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची सुनावणी व चौकशी घेतली जात नाही असे दिसून येते व माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारे ठोकळेबाज निर्णय दिलेले दिसून येते. वकील यांनी नस्तीमध्ये दिनांक २५.४.२००८ च्या निर्णयाची प्रत आहे हे मान्य केले व त्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

४. अपील क्रमांक ७०३/२००८ मध्ये अपीलकर्ती यांनी तीच माहिती प्राचार्य यांना मागितलेली असल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ती यांना उपलब्ध करुन देण्याकरिता सदरचे अपील सुध्दा अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक ७०२/२००८ व अपील क्रमांक ७०३/२००८ ही दोन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना त्यांच्या दिनांक २५.४.२००८ व दिनांक १२.३.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे ती करुन न दिल्यास जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १५.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७०५- १७०७/१५.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१३/२००८ व अपील क्रमांक ७१४/२००८.

श्री. सुभाष बाबुरावजी विखार,
मु. पो. कुर्झा, ता. ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था,
देसाईगंज वडसा (हेटी), जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
संचालक,
शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था,
देसाईगंज वडसा (हेटी), जि. गडचिरोली.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
मागासवर्गीय सुशिक्षित बेकार एज्युकेशन सोसायटी,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
संचालक,
मागासवर्गीय सुशिक्षित बेकार एज्युकेशन सोसायटी,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी दोन्ही अपीलामध्ये गैरहजर आहेत. कार्यालयाची नोटीस ही अपीलाचे सुनावणीकरिता राज्य माहिती

... २

आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.४.२००९ रोजी नोटीस काढण्यात आली असून सुध्दा सदरच्या नोटीसची दखल ही घेण्यात आलेली नाही हा आयोगाचा अवमान असल्यामुळे विभागीय विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी दखल घेणे आवश्यक आहे.

२. अपील क्रमांक ७१३/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संचालक, शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था, देसाईगंज वडसा यांचेकडे दिनांक १.७.२००३ ते दिनांक २५.६.२००८ या कालावधीतील १) शांतीवन अपंग निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्थेचा कॅशबुक, व व्हॉवचर फाईल झेरॉक्स प्रतीत. २) संस्थेद्वारे संचालित आश्रामशाळा कुरुड येथील कॅशबुक, लेजरबुक, व्हावचर फाईल, दाखल रजिष्टर, कर्मचारी हजेरी रजिष्टर. ३) संस्थेच्या सभासदाची सदस्यांची यादी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००८ रोजी प्रथम अपील आयुक्त तथा उपायुक्त, नागपुर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु दिनांक २६.८.२००८ रोजी आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी संचालक, शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था, देसाईगंज वडसा (हेटी) यांचेकडे अपील हस्तांतर केलेले दिसून येते व त्याबाबत अपीलकर्ता यांना प्रतिलिपी दिलेली आहे. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.६.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था, देसाईगंज वडसा (हेटी), जि. गडचिरोली या सार्वजनिक प्राधिकरणातील जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. संस्था ही अनुदानित असल्यामुळे अधिनियमाची तरतुद लागू आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक यांनी अपीलकर्ता यांच्या कोणत्याही

अपीलाच्या कोणत्याही प्रकारे दखल घेतली नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व याबाबत विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी दखल घेऊन प्रशासकीय कार्यवाही संस्थेच्या विरुध्द करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ७१४/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००८ रोजी सन २००३ ते २००८ या कालावधीतील संस्थेच्या सदस्यांची यादी, संस्थेद्वारे संचालित अपंग शाळेची कर्मचारी एकूण संख्या, मंजूर पदे, शाळेतील व्हावचर फाईल झेरॉक्स, दाखल खारीज रजिष्टर, लेजर बुकची झेरॉक्स प्रती, शाळेच्या इमारतीची बांधकाम नगरपरिषदेची परवानगी प्रत, शाळेच्या जागेची सेलडीड प्रत मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून आयुक्त तथा उपआयुक्त, नागपूर विभागीय महसूल विभाग, नागपूर यांचेकडे अपील दाखल केले होते. परंतु सदरचे अपील हे त्याच कार्यालयात दाखल करावे असे अपीलकर्ता यांना कळवून संचालक, मागासवर्गीय सुशिक्षित बेकार एज्युकेशन सोसायटी, मु.पो.ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर याना दिनांक २६.८.२००८ रोजी पत्र दिलेले दिसून येते. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही किंवा प्रथम अपीलाची दखल सुध्दा घेण्यात आली नाही. सदरची संस्था ही अनुदानित आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी संस्थेस लागू होतात. जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची अपीलाची दखल घेतली नसल्याने सदरच्या संस्थेवर नियंत्रण विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचे असल्याने त्यांनी संस्थे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७१३/२००८ व अपील क्रमांक ७१४/२००८ ही दोन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २५.६.२००८ च्या दोनही अर्जाचे संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत संपूर्ण माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास व अपीलकर्ता यांनी तक्रार केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७१३/२००८ व अपील क्रमांक ७१४/२००८ मधील दिनांक २५.६.२००८ च्या दोनही अर्जाचे संदर्भात संस्थेचे जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध दिलेली नसल्यामुळे तसेच अर्जाची दखल सुध्दा घेतली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द प्रत्येकी रुपये २५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा प्रत्यक्ष संस्थेचे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२००९ रोजी आयोगापुढे करावा. तसे न केल्यास शास्ती कायम होईल व सदरची शास्तीच्या रक्कमेची वसुली जनमाहिती अधिकारी यांचे वेतनातून किंवा संस्थेच्या अनुदानातून विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी करुन लेखाशिर्ष

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७०८- १७११/१६.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१०/२००८.

श्री. गोविंद सदाशिव मेश्राम,
शक्तीमातानगर, प्लॉट नं. २९,
खरबी रोड, हसनबाग, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
प्रकाश भवन, सदर, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
प्रकाश भवन, सदर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी हे विना अनुमती गैरहजर आहेत. आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.४.२००९ रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आलेली आहे. परंतु उत्तरवादी आज हजर नाहीत व कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाही हा आयोगाचा अवमान आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, नागपूर यांनी करणे आवश्यक आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२..६.२००७ रोजी कार्यकारी अभियंता (प्रशासन) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, नागपूर यांचेकडे विद्युत विभागाने मला १७७९०/- रुपयांचे देयक दिले होते ते दुरुस्त करण्याकरिता मी अनेक निवेदन दिले व प्रत्यक्ष भेटले पण ते देयक दुरुस्त करण्यात आले नाही व माझ्या

... २

घरातून विद्युत मिटर मी नसतांना विद्युत विभागाने नेले. खालील माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २८.६.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. तसेच दिनांक ३०.८.२००७ रोजी सुध्दा माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, महाल विभाग यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु त्यांना तरीही सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरिता त्यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नाही व त्याबाबतही कोणताही पत्र व्यवहार अपीलकर्ता यांचेशी झाला नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही हे सिध्द होते व त्यामुळे संबंधित तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांच्या दिनांक २२.६.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने संपूर्ण माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.६.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा प्रत्यक्ष आयोगाकडे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२००९ रोजी करावा व तसे न केल्यास सदरचे रुपये २५०००/- शास्ती ही कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन न दिल्यास पुन्हा विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७१२- १७१४/१६.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१५/२००८.

श्री. डॉ. अशोक गजानन लांजेवार,
एम-५, प्रिमीयम प्लाझा, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य महाव्यवस्थापक (नियंत्रण)
औष्णिक विद्युत केंद्र,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर - ४४१ १०२.

श्री. आर. डी. रॉय,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (नियंत्रण)
औष्णिक विद्युत केंद्र,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर - ४४१ १०२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे येऊ शकत नाही असे माहिती अधिकारी यांनी सांगितले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२००८ रोजी श्री. आर. के. सोनी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी सादर केलेल्या त्यांच्या कालावधीतील अतिरिक्त जादा कामाची माहिती एकूण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे

... २

अनुषंगाने दिनांक २६.६.२००८ रोजी एकूण ७ मुद्यांवर माहिती दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी तथा मुख्य महाव्यवस्थापक (नि.) कार्यालय औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १३.८.२००८ रोजी संदर्भीय अर्जाद्वारे कळविण्यात येत आहे की, माहिती अधिकारी, खापरखेडा यांनी पत्र क्र. १६९, दिनांक २६.६.२००८ अन्वये दिलेली माहिती सत्य असून कोणतीही दिशाभूल केलेली नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीचे वेळेस युक्तिवाद करतांना असे सांगितले की, श्री. आर. के. सोनी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी सादर केलेल्या दिनांक २७.१०.२००३ ते ३१.१०.२००३ च्या अतिरिक्त जादा कामाबद्यल प्रपत्रांवर शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या शिफारस सहया व विभाग प्रमुखांची मंजूरी नसतांना प्रपत्रे कार्यालयाने मंजूर करुन देयके कंपनीच्या कोणत्य नियमाने आणि तरतुदीने दिली याबाबत माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. नियम बाहय अतिरिक्त जादा कामाची प्रपत्रे सादर करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली. कार्यवाही केली नसल्यास तशी सविस्तर माहिती असे जे विचारले आहे. नियमबाहय पत्र दाखल केले नाही असे त्यांनी सांगितले. त्याकरिता आयोगाकडे परिपत्रक ५०, सुधारित परिपत्रक ३७ हे अपीलकर्ता यांनी सादर केलेले आहे. सक्षम अधिकाऱ्यांच्या सहया नसलेल्या ४ ओव्हर टाईम शिट सादर केलेले आहे व त्यावरुन त्यांचे म्हणणे असे आहे की, हे नियमबाहय असल्यामुळे चुकीची माहिती दिली. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा आयोगाचे कार्यालयास केलेला आहे. उक्त विषयांतर्गत डॉ. श्री. अशोक लांजेवार, नागपूर यांनी मा. आयोगासमोर सादर केलेल्या दिनांक १.१०.२००८ च्या द्वितीय अपीलाचा खुलासा खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे. डॉ. अशोक लांजेवार यांनी दिनांक ३१.५.२००८ रोजी केलेल्या अर्जानुसार माहिती अधिकारी यांनी पत्र क्रमांक १६९, दिनांक २६.६.२००८ अन्वये श्री. लांजेवार यांना माहिती दिलेली आहे. सदर माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १९.७.२००८ अन्वये प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलासह त्यांनी नमुद केलेले सहपत्र-१ प्राप्त झाले नसल्याने अपील अधिकारी यांनी पत्र क्रमांक १९०, दिनांक २८.७.२००८ अन्वये सहपत्र पाठविण्याची विनंती डॉ. लांजेवार यांना केली.

डॉ. लांजेवार यांनी पत्र दिनांक ५.८.२००८ अन्वये सहपत्र पाठविल्यानंतर अपील अधिकारी यांनी पत्र क्रमांक २०० दिनांक १३.८.२००८ अन्वये त्यांना कळविले की, माहिती अधिकारी यांनी पत्र क्रमांक १६९, दिनांक २६.६.२००८ अन्वये दिलेली माहिती सत्य असून कोणतीही दिशाभुल केलेली नाही. महोदय श्री. सोनी यांनी सादर केलेल्या अतिरिक्त जादा कामाबद्यलच्या प्रपत्रावर विभाग प्रमुखांच्या/शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या/मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सहया नाहीत असा डॉ. लांजेवार यांचा आक्षेप आहे. वास्तविक या सादर केलेल्या प्रपत्रांवर श्री. सोनी ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत होते त्या अधिकाऱ्याची/ काही ठिकाणी विभाग प्रमुखांची स्वाक्षरी आहे व हया स्वाक्षऱ्या फक्त अतिकालीक जादा काम केलेले आहे व अतिकालीक भत्ता देण्यात यावा अशी शिफारस असल्याबाबत आहेत. दर दिवशीचे प्रपत्रांवरुन एक एकत्रीत प्रपत्र तयार करण्यात येते व त्या प्रपत्रावर संबंधित विभाग प्रमुख आणि अतिकालीक भत्त्यास मंजूरी देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी होते व त्यानंतरच अतिकालीक भत्ता संबंधीतास देय होतो. त्यामुळे अतिकालीक भत्त्याच्या प्रत्येक प्रपत्रावर विभाग प्रमुख आणि अतिकालीक भत्त्यास मंजूरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असलीच पाहिजे असे नाही. वरील विवेचनावरुन माहिती अधिकारी व अपील अधिकारी यांनी डॉ. लांजेवार यांना दिलेली माहिती ही सत्य असून कोणतीही खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास सर्व ओव्हर टाईम संयुक्त परिपत्रकावर मंजूरीच्या सहया आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. ओव्हर टाईम शिट पाठवितांना त्यावर कार्यालय प्रमुखांच्या सहया असतात व मंजूरीकरिता एकत्रित करुन मंजूर कार्यालय प्रमुखांच्या सहया असतात व अपीलकर्ता यांना तशा प्रकारची माहिती नको होती असे जनमाहिती अधिकारी यांनीच सांगितले. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणात ज्या स्वरुपात उपलब्ध असते. उदा.:- कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज या स्वरुपात छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. सदरच्या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली तर त्याबाबत कोणती तक्रार राज्य माहिती आयोगास नाही व त्यामुळे अतिरिक्त जादा कामाबद्यल सहीचे आदेश मिळत आहेत. दस्तऐवजांची माहिती मिळते व त्या अनियमितता संबंधात सक्षम अधिकाऱ्याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे आवश्यक असतें. वास्तविक अपीलकर्ता यांनी ज्या ओव्हर टाईम शिट जोडलेल्या आहेत त्या शिट त्यांना दिनांक ३१.१.२००८ च्या माहितीचा स्वतंत्र अर्जात मागितलेली आहेत व त्या शिट हया अर्जाच्या संबंधात

जोडून चुकीची माहिती दिली अशा प्रकारे आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.५.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुनही ज्या पध्दतीने माहिती मागितलेली आहे ती माहिती विश्लेषणात्मक अशी आहे व ती नमुद केल्याप्रमाणे अपेक्षित नाही व त्यावरुन अपीलकर्ता हे आयोगाची सुध्दा दिशाभूल करतात असा निष्कर्ष काढावा लागतो. कार्यालयाकडून आलेली शिट व सर्व कर्मचाऱ्यांची एकत्रित करुन मंजूर केलेली शिट हे स्वतंत्र बाब आहे व त्या सरमिसळ करता येते व तसा प्रयत्न करुन चुकीची माहिती दिली असा प्रयत्न केलेला आहे. अपीलकर्ता यांना एकत्रित शिट सुध्दा पुरविण्यात आली आहे व ती बाब अपीलकर्ता यांच्या युक्तिवादात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता हे दुसऱ्या अर्जाचे माध्यमातून मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये युक्तिवाद करीत आहेत व ही बाब योग्य नाही. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे ती माहिती योग्य व बरोबर आहे. त्यामुळेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती ही योग्य व बरोबर आहे असा निर्णय दिलेला आहे. तरीसुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही व त्यांचेकडून अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे याबाबत मुख्य अभियंता यांनी दखल घेणे आवश्यक आहे तशी समज प्रथम अपीलीय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असली तरी त्यांना माहिती व माहितीचा अधिकार या दोन व्याख्येच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कल्पना नसल्यामुळे ते आयोगास चुकीच्या कल्पने प्रमाणे वाद घालत असतात. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १६.५.२००९**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७१५- १७१८/१६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१९/२००८.**

श्री. वामनराव जयरामजी बालपांडे,
प्लॉट नं. १२५, विठ्ठलवाडी, पो. म्हाळगीनगर,
हुडकेश्वर रोड, नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सचिन ल. तालेवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, ग्रामीण विभाग,
गणेश भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. एन. एल. मेंढे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभाग, पारशिवनी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.२००८ रोजी सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी डिस्ट्रीबुशन कंपनी लिमिटेड, उपविभाग, पारशिवनी (ग्रामीण) यांचेकडे वासुदेव गुलाब बालपांडे, मु. दहेगांव जोशी ता. पारशिवनी, जि. नागपूर हयांचे ग्राहक क्रमांक ४२२८००५२७५४/४ हयांनी घर क्रमांक ७ वार्ड क्रमांक २ येथील जयरामजी बालपांडे, दहेगांव जोशी यांचे मालकीचे घरी विज कनेक्शनसाठी दिलेल्या अर्जाची

संपूर्ण माहिती अंदाजे सन १९९५-९६ नंतर अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.७.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००८ रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक ३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी कागदपत्रे दिलेली दिसून येतात व ते पत्र व दिनांक २४.९.२००८ चे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक १.५.२००८ रोजी स्विकृत केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे नुसार उत्तर उपलब्ध झाले नाही असे सांगितले त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना वारंवार भेटलो. परंतु त्यांनी माहिती दिली नाही तसे जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २४.९.२००८ चे पत्र त्यांना उपलब्ध करुन दिले होते. परंतु त्यांनी स्विकारले नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कागदपत्रे कार्यालयात १० वर्षापर्यंत जतन करण्यात येतात व अपीलकर्ता यांनी मागितलेली कागदपत्रे ही १५ वर्षाचे पूर्वीची असल्यामुळे जतन केलेली नाही व जाळपोळ सुध्दा झालेली आहे त्यामुळे कार्यालयात कोणतीही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांची त्यांनी जाळपोळ झाली असली तरी त्याबाबत त्यांनी अहवाल उपलब्ध करुन दिलेला असल्यास पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली असल्यामुळे त्याबाबतचा एफ.आर.ची कागदपत्रे नष्ट करण्याची प्रत ही उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांची माहिती उपलब्ध नसल्या संदर्भामध्ये जे जाळपोळीचे कारण दिलेले आहे त्याबाबतचा पुरावा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी व्यक्तिशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७२०/२००८.**

सौ. उमा अशोक नागपुरे,
झिंगुजी वार्ड, मेन रोड,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. दिपक प्रल्हादराव देवहाते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
वरोरा, जि. चंद्रपूर.

श्री. प्रभाकर पटवारीजी मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, भद्रावती, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ९.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती विना अनुमती गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २७.११.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी मर्यादित, उपविभाग भद्रावती यांचेकडे मिटर क्रमांक सीएल ४७६९ बाबत दिनांक १.१.२००४ ते आजपर्यंत एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वत: घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.१२.२००७ रोजी

... २

१२ पृष्ठांकरिता एकूण रुपये २४/- ची मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे एकूण १२ प्रती त्यांना दिनांक १.१.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आल्या. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक ७.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ती यांना निर्णय दिनांक १४.५.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ३०.४.२००९ रोजी कार्यकारी अभियंता यांनी माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी माहिती सुनावणीचे वेळी सादर करावी अन्यथा दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहाल असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

३. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ती गैरहजर असल्यामुळे व त्यांचे अपील मेमोमध्ये कोणत्याही प्रकारचे योग्य तो खुलासा केलेला नसल्यामुळे अपीलकर्ती यांना दिनांक १.१.२००८ रोजी माहिती उपलब्ध झाली हा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. सौ. उमा अशोक नागपूरे, झिंगुजी वार्ड, भद्रावती यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) खाली अपील अर्ज दिनांक ७.५.२००८ रोजी पोष्टाद्वारे या कार्यालयास दिनांक १५.५.२००८ ला प्राप्त झाला असून आवक नोंदवहीमध्ये ३८५९ क्रमांकाने नोंद झालेला आहे. यानंतर सदर अर्ज माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्री. पी. डी. मोटघरे यांना दिनांक ३०.५.२००८ ला डाकबुकांद्वारे हस्तांतरीत करण्यात आला. राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे सौ. उमा अशोक नागपुरे, भद्रावती यांचे अपील क्रमांक ७२०/२००८ ची सुनावणी दिनांक १६.५.२००९ ला असल्याचे पत्र क्रमांक रामाआ/अपील/१९४९/०९, दिनांक १८.४.२००९ या कार्यालयास दिनांक २०.४.२००९ ला प्राप्त झाले. त्यानंतर पत्र क्रमांक काअ/संवसु/वरोरा/माअ/२०, दिनांक ३०.४.२००९ अन्वये श्री. पी.डी.मोटघरे, माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सं व सु विभाग, वरोरा यांना सौ. उमा अशोक नागपुरे, भद्रावती त्यांचे दिनांक ७.५.२००८ चे अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा खुलासा मागविण्यात आला. परंतु अजूनपर्यंत त्यांनी सादर केलेला नाही. तसेच पत्र क्रमांक काअ/संवसु/वरोरा/माअ/२०, दिनांक ३०.४.२००९ अन्वये माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सं व सु. उपविभाग, भद्रावती यांना सुध्दा सौ. उमा अशोक नागपुरे यांचे अपील अर्जाबाबतची माहिती मागविण्यात आली. त्यांनी सदर माहिती त्यांचे पत्र क्रमांक स.अ./भद्रावती/७६७

दिनांक १३.५.२००९ ला सादर केली. त्यानुसार अर्जदारास माहिती दिनांक १४.५.२००९ ला सादर केलेली आहे. वास्तविक अपीलकर्ती यांनी जी माहिती मागितली व त्यांना दिनांक १.१.२००८ रोजी ती मिळाल्यानंतर समाधान न झाल्यामुळे अपील हे ३० दिवसांचे आंत करावयाची असते. परंतु प्रथम अपील त्यांनी विलंबाने केलेली आहे व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्या प्रथम अपीलाची दखल घेतली नाही व यावरुन अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली आहे या कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७२२- १७२४/१६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७२३/२००८ व अपील क्रमांक ७२४/२००८.**

श्री. शिवशंकर महादेव उरकुडे,
रा. खांबी (पिंपळगांव),
ता. अर्जुनी मोर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भुमी अभिलेख, गोंदिया.

श्री. या. ल. चिंधालोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
परि.भु. वरिष्ठ लिपीक,
अधिक्षक,
भुमी अभिलेख, गोंदिया.

श्री. के. एन. के. राव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
गोंदिया.

श्री. के. बी. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी दोन्ही अपीलामध्ये हजर आहेत.

२.	अपील क्रमांक ७२३/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, गोंदिया यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. रिसर्व्हे पुर्वी त्या नावाने असलेली मौजा खांबी त.सा.क्र. १२, ता. अर्जुनी मोर येथील गट नं. ३४/२ आराजी ०.३५ आर. आ. ०.८० वर्ग २ ची जमीन रिसर्व्हेतील चुकीने अद्यावत ७/१२ ला पुर्वीचे विकणाराचे नावाने राजस्व अभिलेखात दर्ज झालेली चुक दुरुस्त करीताचे अर्ज. सदरचा अर्ज हा कार्यालयास दिनांक ८.५.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक २८.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी तत्पुर्वीच दिनांक १६.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिनांक २८.५.२००७ च्या पत्राची प्रत निर्गमित केलेली असल्यामुळे माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाचा निर्णय तो एकच आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक १६.४.२००७ चा जर असला तरी तो कार्यालयास दिनांक ८.५.२००७ रोजी प्राप्त झाला होता व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांनी पोष्टाने अर्ज पाठविला तरी पाठविल्याची तारीख गृहीत धरता येत नाही. दिनांक १६.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते व त्यामुळे प्रथम अपील व माहितीचा अर्ज यांचे उत्तर एकच देण्यात आलेले आहे. अर्जदाराने दिनांक २१.९.२००५ रोजी दाखल केलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली अशी माहिती मागितलेली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना अर्जदारास दिनांक २१.९.२००५ च्या अर्जाची नोंद आवक नोंदवही किंवा तक्रार अर्ज नोंदवही मध्ये आढळून आला नाही व त्यामुळे सदरचा अर्ज हा अप्राप्त असल्यामुळे तसे उत्तर त्यांनी दिलेले होते. माहितीचा अर्ज दिनांक १६.४.२००७ च्या अर्जामध्ये सुध्दा चुकीच्या नावाची दुरुस्ती करण्याकरिता त्यांनी विनंती केली होती. परंतु चुकीच्या नावाची दुरुस्ती करावयाची असल्यास अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे रितसर अर्ज सादर करावा अशी समज दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२००५ चा अर्ज दिला आहे त्याबद्यल

... ३

कोणताही पुरावा कार्यालयाने आयोगाकडे सादर केलेला नाही व त्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारची समज ही जनमाहिती अधिकारी किंवा त्या कार्यालयास देता येत नाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे मात्र अपीलकर्ता यांना अपेक्षित असेलेली दुरुस्ती ही करुन मागता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र जमिन महसुल संहिता, १९६३ च्या तरतुदी प्रमाणे अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया किंवा उपसंचालक, भुमी अभिलेख, नागपूर यांचेकडे करणे आवश्यक आहे. या अधिनियमाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ७२४/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, गोंदिया कार्यालय यांचेकडे यु.पी.सी.ने १०/- रुपयांचे तिकीट लावून अर्ज पाठविलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.५.२००७ रोजी प्रथम अपील जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.१२.२००६ च्या लोकशाही दिन प्राप्त झालेल्या अर्जावर आवश्यक कार्यवाही करुन अर्जदारास परस्पर उत्तर पाठविण्याबाबत उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांना जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचे कार्यालयातून दिनांक ६.१२.२००६ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. मात्र माहितीच्या अर्जाखाली अर्ज अप्राप्त. लोकशाही दिन दिनांक ४.१२.२००६ अन्वये मौजा खांबी त.सा.क्र. ११ ता. अर्जुनी मोर येथील जमीन जुना गट नंबर ३४/२ आराजी ०.३५ आर व नवीन गट नंबर पुनर मोजनीप्रमाणे गट नं. ३८६ आराजी ०.३५ आर. जमीनीवरुन गैरअर्जदार श्री. गुलाब मनोहर व. डोमा वगैरेचे नावे खारीज करुन अर्जदाराचे नावाने सदरहु गटाचे जमिनीवर नांव दर्ज होण्याचा आदेश होण्याबाबत उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने या कार्यालयातील आवक नोंदवही तपासले असता, जोडपत्र अ अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला नसून अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचे कार्यालयास दिसून येतो. त्यामुळे अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यास अपीलीय अधिकारी उपसंचालक, भुमि अभिलेख, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे असे अपीलकर्त्यास दिनाक ६.६.२००७ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते.

५. वास्तविक अपीलकर्ता यांना जी दुरुस्ती अपेक्षित आहे ती दुरुस्ती महाराष्ट्र जमिन महसुल संहिता, १९६३ च्या तरतुदी प्रमाणे अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया किंवा उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे अर्ज/अपील दाखल करुन न्याय मिळवून घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती कार्यालयात उपलब्ध असते तशी माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मागता येत नाही व अपीलकर्ता यांना तशी कार्यवाही करुन मागितलेली विनंती मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक ७२३/२००८ व अपील क्रमांक ७२४/२००८ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १८.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३२/२००८.**

श्री. रमेश पांडुरंग वानखेडे,
२८, केशवराव रेवतकर ले आऊट,
बायपास चौक, ता. उमरेड,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. अजित देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. ए. बी. बुरड,
जनमाहिती अधिकारी तथा
नुतन आदर्श महाविद्यालय,
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी नुतन आदर्श महाविद्यालय, उमरेड यांचेकडे सन १९९६ मध्ये उमरेड पोलीस स्टेशन कडून महाविद्यालयातील एका प्राध्यपकाबद्यल अतिशय गंभीर आरोप करण्यात आले होते. त्याबद्यल अधिक सविस्तर माहिती कळविण्याबाबत पत्र देण्यांत आले होते. त्या पत्राची प्रत कृपया त्वरित पुरविण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी नुतन आदर्श महाविद्यालय, उमरेड यांनी दिनांक १७.४.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाची म्हणून संबंधित प्राध्यापकास पत्र देऊन

... २

माहिती पुरविण्याचे संदर्भात ही माहिती प्रकट करावी किंवा कसे असे लेखी निवेदन द्यावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १९.४.२००८ रोजी सुध्दा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यानुसार दिनांक २६.४.२००८ रोजी त्रयस्थ पक्ष म्हणून संबंधित प्राध्यापकांनी कारणासहित हरकत घेतली दिसून येते. सदरच्या हरकतीमध्ये श्री. रमेश वानखेडे यांनी पत्र उपलब्ध करुन देण्याची केलेली मागणी माझ्या विरुध्द सातत्याने सुरु असलेल्या कटकारस्थानाचाच एक भाग आहे. श्री. वानखेडे हे महाविद्यालयातीलच सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक आहेत. महाविद्यालयाच्या कर्मचारी पतपुरवठा संस्थेचे सचिव असतांना त्यांनी पदाचा दुरुपयोग करुन पैशाची अफरातफरी केल्यासंबंधी मी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. त्याप्रकरणी ते दोषी ठरले होते. त्यांना सहकारी कायद्याद्वारे निवडणूक लढण्यास अपात्र ठरविण्यात आलेले होते. तसेच श्री. वानखेडे यांनी आपल्या सध्या राहत असलेल्या केशवराव रेवतकर ले आऊट येथील निवासस्थानाचे बांधकाम करतांना सार्वजनिक जागेवर अतिक्रमण केल्या संबंधी परिसरातील नागरिकांनी नगरपरिषद, उमरेडला तक्रार निवेदन सादर केलेले होते. त्या निवेदनावर एक नागरिक म्हणून माझी पण स्वाक्षरी आहे. या प्रकरणी अतिक्रमण झाल्याची कबूली स्वतः श्री. रमेश वानखेडे यांनी नगरपरिषद अधिकाऱ्यांना दिलेली आहे. या व इतर अनेक प्रकरणी श्री. रमेश वानखेडे यांचे माझ्याशी असलेले संबंध पूर्वग्रहदुषित भावनेने भरलेले आहेत. याकडे मी आपले लक्ष वेधतो. मला व माझ्या कुटुंबियांना त्रास देण्यासाठी, समाजातील प्रतिमामलीन करण्याच्या दृष्टहेतुने त्यांची पत्राची आपणांकडे मागणी केलेली आहे असे माझे ठाम मत आहे व पुन्हा अनेक सविस्तर आक्षेप घेतलेले दिसून येतात. त्यावर दिनांक १६.५.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अर्जान्वये मागितलेल्या माहिती संबंधात आपला त्रयस्थ पक्षाचा आक्षेप विचारात घेता आपले अर्जदाराशी वैयक्तिक संबंधि माहिती उघड करण्यास परावृत्त करु शकत नसल्यामुळे अर्जदाराने संदर्भीय अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येत आहे कृपया नोंद घ्यावी. उपरोक्त निर्णयाविरुध्द माहिती अधिकार कलम १९ अंतर्गत आपण अपील करु शकता असे त्रयस्थ पक्षास कळविलेले दिसून येते. त्यावर पुन्हा दिनांक १४.६.२००८ रोजी त्रयस्थ पक्ष यांनी दोन प्रतीमध्ये अपील दाखल केलेले आहेत. निर्णयाची अंमलबजावणी करु नये असे माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांना प्राचार्य, नुतन आदर्श महाविद्यालय, उमरेड यांचे अपील त्यांचेकडे हस्तांतरण केलेले दिसून येते. प्राचार्य यांनी दिनांक १०.७.२००८ रोजी सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर

यांना प्रथम अपील अधिकारी म्हणून निर्णय द्यावा अशी विनंती केलेली दिसून येते. त्यावर दिनांक २२.७.२००८ रोजी सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांनी प्राचार्य, नूतन आदर्श महाविद्यालय, उमरेड यांना मागितलेली माहिती संस्थेच्या कामाशी निगडीत नसल्यामुळे व त्रयस्थानी नकार दिलेला असल्यामुळे नियम ११(१) नुसार श्री. वानखेडे यांना देण्यात येऊ नये असे पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ५.८.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती देण्यात येऊ नये असे आदेश दिलेले असल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्या निर्णया विरुध्द त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सुनावणीचे वेळेस श्री. रमेश वानखेडे यांनी मागितलेली माहिती पोलीस स्टेशन, उमरेड यांचे संदर्भात असल्यामुळे त्यांनी संबंधित पोलीस स्टेशन कडून माहिती घ्यावी. त्यांचे अपील फेटाळण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्रयस्थ पक्षाची हरकत घेतांना जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांचा विचार केला असता अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भातला जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. अपीलकर्ता यांनी सदरचे पत्र हे पोलीस स्टेशन, उमरेड मधील मुळ पत्र असल्यामुळे पोलीस स्टेशनकडे तशी माहिती मागावी व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १८.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**
**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७२९- १७३१/१८.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७२९/२००८.

श्री. राजविलास अंबादास आत्राम,
शिवाजीनगर, वार्ड क्रमांक ३,
चांदमारी चौक, तुकुम, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक,
दक्षिण चंद्रपूर वनवृत्त,
मुल रोड, चंद्रपूर.

श्री. एच. एम. छाजेड,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (योजना)
दक्षिण चंद्रपूर वनवृत्त,
मुल रोड, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००८ रोजी विभागीय वन अधिकारी (योजना) दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसू येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र उपलब्ध झालेली माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्त्यास सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.८.२००८ रोजी टपालाद्वारे पाठविण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.    अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत त्यांच्या एकूण ४ मुद्यांपैकी २ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये अर्जदाराचे प्राप्त झालेल्या अर्जाची छायांकित प्रत ही माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांनी कळविलेले होते व त्याच प्रमाणे मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये अर्जदाराचे अर्जावरील सर्व माहिती संगणकामध्ये नोंद केलेली नाही व त्यामुळे सदरची माहिती देता येत नाही असे ही कळविले व त्यामुळे अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अर्जदाराने त्यांचे अर्जात म्हटलेली माहिती व सोबत दाखल केलेली माहिती ही त्यांची वैयक्तिक माहिती आहे. त्यामुळे कलम ११ प्रमाणे ही माहिती प्रकट करणे योग्य नाही व म्हणून तसे त्यांना कळविण्यात आले होते. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १८.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३६/२००८.

सौ. सरिता राजू वंजारी,
चंद्रशेखर वार्ड, मुर्रो रेल्वे चौकीजवळ
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. एल. जी. पाथोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक, (सामान्य प्रशासन विभाग),
जिल्हा परिषद, भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १९.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २२.५.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे माझे पत्र दिनांक २४.१२.२००७ चे पत्र व दिनांक १.२.२००८ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळण्याबाबत. माहिती व्यक्तिशः आवश्यक आहे. अपीलकर्ती यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.७.२००८ रोजी अपीलकर्ती यांच्या अर्जाच्या सत्यप्रती प्राप्त झाल्या असून प्राप्त झालेल्या अर्जाचा आधारे दिनांक १.२.२००८ च्या अर्जान्वये अनुकंपा कारणास्तव नियुक्ती दिनांकापासून शैक्षणिक पात्रतेनुसार फेरनियुक्ती बाबत नस्ती, अनुकंपा लाभासाठी वेळोवेळी शासन, निर्णयाचे आधारे निर्णयास्तव कार्यवाही करिता असून अंतिम निर्णय होताच आपणास वरील विषयांकित निर्णय त्वरित कळविण्यांत येईल. असे अधिक्षक

तथा सहाय्यक जनमाहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांनी अपीलकर्ती यांना कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तसेच दिनांक २४.७.२००८ रोजी संदर्भीय पत्रासोबत सहपत्रित केलेला दिनांक २४.१२.२००७ चे निवेदन आपण या कार्यालयास थेट पाठविल्याचे दिसून येते. आपण जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत जबाबदार पदावर कार्यरत आहात. तसेच पुर्वी केलेल्या नियुक्ती संदर्भात मुळ जिल्हा परिषदेकडे तक्रारी असल्यास सध्या कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेकडील सक्षम प्राधिकारी यांचेकडून निवेदन येणे अभिप्रेत आहे. त्याशिवाय आपल्या निवेदनावर विचार करता येणार नाही. असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज केलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ती यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ती यांनी असे सांगितले की, आता पर्यंत त्यांना त्यांच्या अर्जावर झालेली कार्यवाहीचा अहवाल मिळाला नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती हया गोंदिया जिल्हा परिषद मध्ये वरिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत व त्यांनी माहितीचा अर्ज हा जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे केला होता. त्यांना दिनांक २४.१२.२००७ व दिनांक १.२.२००८ च्या अर्ज हा जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे केलेला आहे. वास्तविक अपीलकर्ती यांनी सदरची दोन्ही अर्ज सुरुवातीला जिल्हा परिषद, गोंदिया यांचे मार्फत योग्य मार्गाने पाठविणे आवश्यक होते व तसे ते पाठविलेले नसल्यामुळे त्यांचा अर्जावर विचार करता येणार नाही असे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांनी गोंदिया जिल्हा परिषदेच्या माध्यमातून योग्य मार्गाने भंडारा जिल्हा परिषदेकडे अर्ज केल्यास त्याबाबतचा निर्णय करता येईल. त्यावर अपीलकर्ती यांनी असे सांगितले की, भंडारा जिल्हा परिषदकडे गोंदिया जिल्हा परिषदकडून अर्ज आलेला आहे व त्याबाबतची नोंद सुध्दा झालेली आहे. तसे असले तरी ज्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु गोंदिया जिल्हा परिषद कडून भंडारा जिल्हा परिषदेकडे अर्जाची प्रत न आल्यास तशा प्रकारचा अर्ज हा अपीलकर्ती यांनी गोंदिया जिल्हा परिषद माध्यमातून योग्य मार्गाने भंडारा

जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात यावा म्हणजे योग्य तो निर्णय भंडारा जिल्हा परिषदेला घेता येईल व तसा अहवाल अपीलकर्ती यांना उपलब्ध करुन देणे शक्य होईल. मात्र सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १९.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७३४- १७३६/१९.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३७/२००८.**

श्री. केशव विठोबाजी तेलंग,
संत तुकडोजी वार्ड, तेलंग पेट्रोल पंप समोर,
नागपूर रोड, ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
समुद्रपूर, जि. वर्धा.

श्री. अन्ना पुंडलिकराव काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, समुद्रपूर,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, समुद्रपूर यांचेकडे सन १९५८-५९ कुळपंजीची नक्कल मिळण्याबाबत मौजा कार्डा स.न. ४५ आ. २.५३ हे.आ. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अर्जदार श्री. केशवराव विठोबाजी तेलंग, रा. हिंगणघाट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मौजा कार्डा येथील शेत

... २

सर्व्हे नं. ४५ आराजी २.५३ हे.आर.ची सन १९५८-५९ सालच्या कुळ पंजीची नक्कलेची मागणी केली. त्यानुसार दिनांक २५.४.२००८ रोजी तहसील कार्यालयाच्या अभिलेखागार लिपीकाकडून सदरहू माहिती मागविण्यात आली. त्यानुसार तहसील कार्यालय, समुद्रपूर येथील अभिलेखागार लिपीक यांनी त्यांचे पत्र दिनांक ६.५.२००८ अन्वये अभिलेखागारातील अभिलेखाची पडताळणी केली असता सन १९५८-५९ सालची कुळपंजी अभिलेखागारात उपलब्ध नसल्यामुळे कुळ पंजीची प्रमाणित प्रत देणे शक्य होत नाही असे या कार्यालयास कळविले. वरील अहवालाच्या आधारे अर्जदार श्री. केशवराव विठोबाजी तेलंग, रा.हिंगणघाट यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक १५.५.२००८ नुसार सन १९५८-५९ सालची कुळ पंजीची प्रमाणित नक्कल देणे शक्य नाही असे यु.पी.सी. पोष्टाद्वारे कळविण्यात आले. असे असले तरी जनमाहिती अधिकारी पुन्हा एक वेळ सदरची कुळपंजीची नस्तीची सखोल शोध घेऊन माहिती उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक राहिल. त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.४.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती ही पुन्हा एक वेळ सखोल शोध घेऊन उपलब्ध झाल्यास विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १९.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४१/२००८.

सौ. कलावती भि. कोल्हे,
रामबाग कॉलनी समोर, १६ राजाबाक्षा,
मेडीकल कॉलनी रोड, नागपूर - ४४० ००३. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, उमरेड,
जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, उमरेड,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १७.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.४.२००९ रोजी आजच्या सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती. परंतु गट विकास अधिकारी व खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरेड हे हजर झाले नाही किंवा त्यांनी कोणत्याही प्रकारचा अर्ज पाठविला नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १६.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी (शिक्षण विभाग) पंचायत समिती, उमरेड यांचेकडे ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध घाली नाही म्हणून

... २

अपीलकर्ती यांनी दिनांक १०.७.२००८ रोजी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरेड यांचेकडे दाखल केलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उमरेड यांनी दिनांक ३१.५.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे श्रीमती कलावती कोल्हे यांचे मुळ सेवापुस्तकाच्या साक्षांकित प्रती माहितीच्या अधिकारात त्यांना देण्याकरिता त्यांचे मुळ सेवा पुस्तक या कार्यालयांस लवकरात लवकर पाठविण्यात यावे असे पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी ही अपीलकर्ती यांना दिलेली आहे. तत्पुर्वी दिनांक २.५.२००८ रोजी दिनांक १६.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उमरेड यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे श्रीमती कलावती कोल्हे यांचे सुधारित परिगणनापत्रक तयार करुन पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसते. त्या पत्राची प्रत अपीलकर्ती यांना दिलेली आहे. परंतु त्यानंतरही कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ती यांनी आयोगास सांगितले व त्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना त्यांच्या दिनांक १६.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची आहे.

४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७३९- १७४१/१९.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४३/२००८.**

श्री. हनमंतराव मोनाजी राऊत,
टिळकनगर, वार्ड नं. ४ (वडसा रोड)
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

कु. आर. जी. पुरी,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत विभाग,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अधिक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे पंचायत समिती राजूरा, ग्रामपंचायत भुरकुंडा खुर्द येथील प्रशासक या पदाच्या दिनांक १९.६.१९९४ ते २७.९.१९९५ पर्यंतच्या अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्यल मिळणाऱ्या विशेष वेतनाची रक्कम मिळण्याबाबत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहितीकरिता अतिरिक्त खर्चाचे रुपये १०/- भरणा करावा असे कळविण्यात आले होते. तसेच मुद्या क्रमांक २, ३ व ४

... २

मधील माहिती ही प्रश्नांच्या स्वरुपात असल्यामुळे माहितीचे अधिकारानुसार उक्त बाबींची माहिती पुरविता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु हे पत्र मिळालेले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांनी दिनांक ६.५.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी झाली परंतु नोटशिटवर नोंद घेण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४२७/२००७ मध्ये आयोगाने दिनांक १७.९.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाचे संदर्भामध्ये दिनांक ९.१०.२००७ रोजी एकूण २० मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व तरीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे ते त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वास्तविक प्रथम अपीलाचा निर्णय हा नोटशिटवर न करता स्वतंत्रपणे निर्णय देऊन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. कारण त्या निर्णयाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाची असते हे सामान्य ज्ञान प्रथम अपीलीय अधिकारी यांना असणे आवश्यक आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही असे असले तरी अपीलकर्ता यांना निर्णय उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय नोटशिटवर ज्याप्रमाणे दिलेला आहे त्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- १९.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७४२- १७४३/१९.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५४/२००८.

श्री. जगन गणपतरावती टाकळीकर,
जुनी मंगळवारी, मट्टीपूरा रोड,
नागेश्वर प्रायमरी शाळेजवळ,
नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. जे. फुले,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.५.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र, दाखल खारीज रजिष्टरचा उतारा आणि शाळेची मान्यता बाबत. माहितीचा कालावधी दिनांक ३०.६.१९३८ ते ३१.११.१९३९ सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.५.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक

... २

२७.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.८.२००८ रोजी देण्यात आलेला असून सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस असे सांगितले की, मुद्या क्रमांक २ व मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भात त्यांना माहिती अपूर्ण मिळाली आहे व नियमाने माहिती दिली नाही. मुद्या क्रमांक ५ चे अवलोकन केले असता ते स्वयंस्पष्ट असल्यामुळे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात मी शाळा संहितेच्या नियमाचे संदर्भातील छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना शाळा संहिता अधिनियमाच्या तरतुदीच्या मधील संबंधित नियमाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७४४- १७४५/२०.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५२/२००८.

श्री. नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो. इटखेडा,
ता. अर्जुनी मोर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एच. जी. सुपले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, अर्जुनी मोर,
जि. गोंदिया.

श्री. पी. आर. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत कार्यालय, जानवा,
ता. अर्जुनी मोर, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, जानवा यांचेकडे ग्रामसभेच्या जाहीर न लावता न कळत सभा घेऊन दिनांक २१.६.२००८ ला घरकुल वाटप केल्या प्रकरणी नक्कल मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती दिनांक २३.९.२००८ रोजी पुरविण्यात आलेली दिसून येते. परंतु दरम्यान माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम

... २

अपीलाचा निर्णय दिनांक २२.९.२००८ रोजी देण्यात आला. मुद्या क्रमांक ६ अन्वये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सोबत दिनांक २३.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध झाल्याची पोच दिलेली आहे. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ८.९.२००८ च्या अर्जानुसार मिळालेल्या माहितीनुसार नकलेमध्ये एस.सी.ला घरकुल कां म्हणून देण्यात आले नाही व किती वर्षापासून तसेच ग्रामपंचायत कार्यालयात प्रतिक्षा यादीत घरकुल लाभार्थीची नोंद नाही कारण काय अशा प्रकारची माहिती उपलब्ध झालेल्या माहितीवरुन पुन्हा माहिती मागितलेली दिसून येते व तसे अपीलकर्ता यांनी तोंडी युक्तिवाद केला. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे जशी माहिती उपलब्ध आहे तशी माहिती. ते गुणवत्तेच्याबाबत निर्णय घेतला नसेल तर त्याबाबत कारणमिमांसेप्रमाणे अपीलात किंवा द्वितीय अपीलात विचारता येत नाही व त्याकरिता अपीलकर्ता यांना खंड विकास अधिकारी यांचेकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७४६- १७४७/२०.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५३/२००८.**

श्री. सुसई राज पिल्लई,
प्लॉट नं. ५७, साईनाथ अर्पाटमेंट,
काटोल रोड, नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. आकुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर प्रादेशिक (विद्युत निरिक्षण मंडळ)
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
सार्वजनिक बांधकाम परिसर,
बंगला नं. २९/१, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. आर. आर. आकुलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
विद्युत निरिक्षक,
नागपूर प्रादेशिक (विद्युत निरिक्षण मंडळ)
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
सार्वजनिक बांधकाम परिसर,
बंगला नं. २९/१, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००८ रोजी Mr. Able Ingatius S/o A. Anand यांची माहिती एकूण ५ मुद्यात जनमाहिती अधिकारी तथा विद्युत निरिक्षक यांचेकडे मागितलेली दिसून येते. अर्जाचे

... २

अनुषंगाने दिनांक २८.८.२००८ रोजी मा. माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती/नागपूर विभांना यांना वरील संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार मार्गदर्शन मागितले आहे. त्यांचे मार्गदर्शन प्राप्त होताच आपला अर्ज निकाली काढण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.९.२००८ रोजी श्री. एबल इग्नाटीस यांनी दिनांक १३.८.२००८ च्या त्यांच्या अर्जात असे नमुद केले आहे की, माझ्याशी संबंधित असलेली कोणतीही वैयक्तिक माहिती तिसऱ्या व्यक्तिस, सेक्शन ८(१) (डी) आणि (जे) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने देण्यात येऊ नये असे म्हटले आहे. त्यामुळे आपला माहितीच्या अधिकारातील अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे. सोबत श्री. एबल इग्नाटीस यांच्या अर्जाची छायाप्रत जोडलेली दिसून येते. त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, आमचे घराची केस हायकोर्टात दाखल झालेली आहे. त्याकरिता वरील कागदपत्रांची अत्यंत आवश्यकता आहे. कारण त्या दस्तावेजामध्ये एबल इग्नॅसिसच्या वडीलांचे नाव नमुद आहे व ते कोर्टात दाखल करण्याकरिता आवश्यक आहे. त्याकरिता सर्व्हीस बुकची झेरॉक्स कॉपी लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती असल्यामुळे ती अपीलकर्ता यांना देण्याचा पुरावा कलम ११ प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबाबत अवगत केले होते. परंतु त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती ही श्री. एबल इग्नॅसिस यांची वैयक्तिक माहिती अधिकारात असल्यामुळे जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यावर श्री. एबल इग्नॅसिस यांचे नांव अधिकृतरित्या कळविले तर त्यांना ते त्वरित द्यावी ती श्री. एबल इग्नॅसिसची माहिती आहे व त्यामुळे श्री. एबल इग्नॅसिस यांचे वडीलाची माहितीत असलेले नाव असलेल्या कागदपत्राची प्रमाणित प्रत छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी श्री. एबल इग्नॅसिस यांचे वडीलांचे नाव असलेल्या कार्यालयातील एखादे दस्तऐवजाची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी व्यक्तिशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७४८- १७५०/२०.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४६/२००८ व अपील क्रमांक ७४७/२००८.**

श्री. महेश चैतराम पाली,
३६६, टॉगा स्टँड, धरमपेठ,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. पेंदाम,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नागपूर विभाग क्रमांक ३, प्रशासकीय इमारत,
सिव्हील लाईन, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक -१,
नागपूर विभाग, नागपूर, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर

श्री. एस. एस. कांडलकर,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नागपूर विभाग क्रमांक १, सोमलवार बिल्डींग,
माऊंट रोड, सदर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. पांढरे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी दोन्ही अपीलाचे संदर्भात मागितलेली माहिती संबंधित कार्यालयीन अधिकारी यांनी अर्जदारास कार्यालयात बोलावून अर्जदारास आवश्यक माहिती बाबत मार्गदर्शन केल्यामुळे अर्जदारास समाधान झाल्याने अर्जदार आपले दोन्ही अपील अर्ज मागे घेत असल्याचे लेखी निवेदन दिनांक २०.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोग यांना दिलेले असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

**नागपूर**

**दिनांक :- २०.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७५१- १७५२/२०.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५७/२००८.

श्री. रामसागर पुंडलिक पिलेवान,
८३, हिंदुस्थान कॉलोनी, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. भि. रा. वाढवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. कि. ह. धवडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
(कार्या. पोल - १२),
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पोल - १२, कार्यासन गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक ५.१२.२००७ च्या पत्रान्वये तसेच अर्जदाराने मा.मुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक ३०.११.२००७ रोजी आवश्यक दस्ताऐवजासहित केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २१.१.२००८ च्या पत्रान्वये पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने सदर तक्रारीवर आपण घेतलेल्या निर्णयासहित केलेले असलेल्या कार्यवाहीची साक्षांकित

... २

प्रत पुरविण्याची विनंती आहे. मा.सहसचिव प्र. ता. गौड, (गृहविभाग) दिनांक ५.१२.२००७ चे पत्र. मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मुंबई यांचे पत्र दिनांक २१.१.२००८ चे पत्र. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००७ रोजी कक्ष अधिकारी, गृह विभाग यांनी पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा.मुख्यमंत्री सचिवालयाकडून या विभागाकडे प्राप्त झालेला आपला अर्ज दिनांक २.२.२००८ अन्वये पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. तदनुषंगाने माहिती मिळण्यासाठी आपण त्यांचे कार्यालयाशी संपर्क करावा व त्या पत्राची प्रत पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेली दिसून येते. त्या अनुषंगाने दिनांक ३१.५.२००८ शासकीय माहिती अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहाय्यक (गुन्हे) यांनी सदरचा अर्ज दिनांक २६.२.२००८ रोजी अन्वये चौकशी व कार्यवाहीसाठी विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कार्यालयात पाठविला आहे. दरम्यान अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयानुसार दिनांक २३.६.२००८ रोजी अपीलीय अधिकारी तथा उपसचिव, गृह विभाग यांनी माहिती ही पोलीस महासंचालनालयातील संबंधित माहिती अधिकाऱ्यांकडून मिळवावी असे आपणास सुचविलेले आहे व त्यामुळे अपेक्षित असलेली माहिती आपणास उपलब्ध झाली आहे त्यानुसार सदरचे अपील फेटाळण्यात आलेले आहे. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये अर्जाचे ५ दिवसात हस्तांतरण केले नाही याकारणास्तव अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी हस्तांतरण जर केले नसेल तर अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००७ च्या पत्राची प्रत ही पोलीस महासंचालक यांचेकडे पाठविलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२००८ रोजी पोलीस महासंचालक यांनी सदरचा अर्ज चौकशीस पोलीस महानिरिक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकडे पाठविलेले कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी मा.मुख्यमंत्री कार्यालयामध्ये तक्रार केली असली तरी सदरच्या तक्रारीची चौकशी ही अंतिमतः ज्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली आहे त्याच पोलीस स्टेशनमध्ये होऊ शकते. त्याकरिता त्यांचा अर्ज हा

प्रत्येक स्तरावर पोलीस स्टेशनकडे वर्ग होईल. याबाबतची जाणीव अपीलकर्ता यांनी ठेवलेली दिसून येत नाही. अर्ज त्यांचा हस्तांतरण केलेला असला तरी माहिती ही पोलीस निरिक्षक यांचे कार्यालयात उपलब्ध होणे असल्यामुळे ती त्याप्रमाणे दिनांक २०.५.२००९ च्या म्हणजे पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. सदरची माहिती ही स्वयंस्पष्ट असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असा निष्कर्ष काढणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७५३- १७५५/२१.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६२/२००८.

श्री. किशोर महादेव आष्टणकर,
घर क्रमांक १५४, वार्ड नं. ९,
गांधी चौक, पोष्ट ऑफीस समोर,
ता. रामटेक, नागपूर - ४४१ १०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नगरपालिका प्रशासन,
नागपूर.

श्री. राजेश माहिते,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, रामटेक,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. विजय देवळीकर, रजा राखीव मुख्याधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, रामटेक नगरपालिका यांचेकडे सन १९९० ते वर्ष २००८ जानेवारी या कालावधी दरम्यान रामटेक शहरात झालेल्या अनधिकृत नियमबाहय व अवैध बांधकाम प्रकरणांची माहिती. सदरची माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमुद

... २

केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.२.२००८ रोजी आपण मागितलेल्या माहितीचा कालखंड हा किमान १८ वर्षाचा वर असल्याने व माहितीचे स्वरुप व्यापक असल्याने आपणास जर विशेषीकृत माहितीची वा निर्णयाचा प्रतीची गरज असल्यास आपण नगरपरिषद कार्यालय बांधकाम विभागात येऊन उपलब्ध नस्तीचे अवलोकन करु शकता. नस्त्या रितसर फी आकारुन पहाणीकरिता उपलब्ध करण्यात येतील. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.५.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती हा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य पुरवावी. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३१.५.२००८ रोजी सन १९९० ते जानेवारी २००८ पर्यंत मागितलेली अनाधिकृत बांधकामाबाबत माहिती पुरविण्यात येत आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न, दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमुद केलेले आहे. तसेच पुन्हा अपीलकर्ता यांना संधी दिल्यास उपलब्ध कागदपत्रे कशी चुकीची आहेत हे सिध्द करुन दाखवतील. परंतु आज अपीलकर्ता हे सिध्द करण्यास हजर नाहीत व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे त्यासंदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा केलेला आहे. अपीलार्थीस या कार्यालयाचे समक्रमांक १०१, दिनांक ३१.५.२००८ अन्वये माहिती पुरविण्यात आलेली आहे. याबाबत पुरावा म्हणून त्यांच्या प्रती सविनय माहितीस व तात्काळ संदर्भास संलग्न आहेत. संबंधित अपीलार्थीने मागितलेली माहितीचा कालखंड हा १८ वर्षाचा इतका दिर्घ आहे. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीनुसार नगरपरिषद स्तरावर अभिलेख प्रत्येक प्रकरणात उपलब्ध नाही. ज्या प्रकरणात अभिलेख उपलब्ध आहे त्या प्रकरणाचा अभिलेख अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. १८ वर्षाचा दिर्घ कालावधीची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास नगरपरिषदेचा मोठा कर्मचारी वर्ग व यंत्रणा या कामाकरिता वळवावे लागेल. त्यामुळे दैनंदिन कामकाज पुर्णतः विष्कळीत होईल. सबब मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षात

... ३

उपलब्ध नसल्यामुळे सर्वेक्षण करुन उपलब्ध करुन देणे ही अवघड प्रक्रिया आहे ही बाब आपले नम्र निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अपीलार्थीने त्यांचे अर्जात दिनांक ३१.५.२००८ चे पत्रान्वये उपलब्ध झालेली माहितीद्वारे काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाचविण्याचे वाईट हेतुने दिली असा आरोप केला आहे. तथापि अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती असेल तशी उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात आलेली असून त्याद्वारे कुणाचेही बचाव करण्याचा नगरपरिषद स्तरावर प्रयत्न करण्यात आलेला नाही ही बाब नम्रपणे नमुद करण्यात येत आहे. देण्यात आलेली माहिती उपलब्ध अभिलेखानुसार अचूक असून त्यातून कोणतीही माहिती नगरपरिषद स्तरावर नष्ट करण्यात आलेली नाही असे याद्वारे नम्र निवेदन करण्यात येते. या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचा अपील अर्ज नस्तीबध्द व्हावा ही विनंती नम्रपणे करण्यात येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज ज्या तारखेला केला असेल त्या तारखेला कार्यालयात जी माहिती जशी उपलब्ध आहे तशीच माहिती उपलब्ध करुन देता येते. कोणत्याही प्रकारे माहिती तयार करुन किंवा अर्ज आल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अभिलेखातून उपलब्ध असेल तशी उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात आली असून त्या स्तरावर कोणत्याही अधिकाऱ्यांचा बचाव करण्याचा प्रत्यन करण्यात आला नाही असे मुख्याधिकारी यांचे म्हणणे योग्य वाटते. तसेच दिनांक २५.७.२००८ रोजी आयोगाकडे खुलासा केलेला आहे त्या खुलाश्यामध्ये सुध्दा अर्जदार नगरपरिषद, रामटेक येथील कायमचे रहिवासी असून त्यांनी याआधी केलेले अनाधिकृत बांधकाम नगरपरिषदने कार्यवाही करुन पाडल्याने चिडून जाऊन अर्जदार हे वरील कायद्याचा गैरमार्गाने वापर करुन नगरपरिषद प्रशासनास त्रास देत आहेत इतकेच नव्हेतर अर्जदाराने नगरपरिषदेला अंधारात ठेवून एकतर्फी नगरपरिषदेची सार्वजनिक जागा आपल्या नावे करुन घेतल्याने व त्याविरुध्द नगरपरिषदेने न्यायालयात दाद मागितल्याने सुध्दा अर्जदार हा नगरपरिषद प्रशासनास या पध्दतीने त्रास देऊन अडचणीत आणत आहे. नगरपरिषद रामटेकने अर्जदारास कुठलीही माहिती अधिकारापासून वंचित ठेवले नसून त्यांनी लावलेला आरोप हा निराधार व बदनामी स्वरुपात असल्याने त्याचा अर्ज रद्दबातल करुन अर्जदारास समज द्यावी जेणे करुन माहिती अधिकाराचा गैरवापर करुन प्रशासनास अडचणीत आणण्याचे धाडस करण्यास कुणीही धजावणार नाही अशीही विनंती केलेली दिसून येते. सदरच्या खुलाश्याच्या संदर्भामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००७ रोजी खुलासा केला होता. परंतु त्याबाबत अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जशी माहिती आहे तशी उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना दिनांक २४.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने जी माहिती जशी उपलब्ध आहे तशी उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७५६- १७५९/२१.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३१५/२००८.

श्रीमती शकुंतलाबाई श्रीधर शेरेकर,
दुपारे ले आऊट, स्वावलंबीनगर,
प्लॉट क्रमांक ५४, सिमेंट रोड रिंग रोड,
पो. प्रतापनगर, नागपूर. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
हिंगणा, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २५.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. गजेंद्र बालपांडे, नायब तहसीलदार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २०.९.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगणा यांचेकडे १) Rev. Case No. १/RTS ६४, तारीख ५.८.१९९१ order passed on ७.६.१९९३ ऑर्डरची सत्यप्रत मिळण्याबाबत. २) Rev. Case No. LNA/२२/५१/९८-९९, तारीख १९.४.१९९६ आपला आदेश झाला त्याची सत्यप्रत मिळणेबाबत. मौजा मांडवा ख.नं. ६२/१, ६२/२, ६२/३ सर्व्हे नं. ६४. माहिती टपालाद्वारे अथवा आपणाकडून फोनवर सुचना आल्यास स्वतः व्यक्तिगत फोन नं. ९३७१२१३३२६ माहिती

... २

गोळा करता येईल अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने तसेच सन १९९०-९१ चे महसुल प्रकरण नोंदवहीमधील पान क्र. ८१ ची स्व. श्री.शामराव शेरेकर यांचे महसूल शेती नोंदणी प्रकरणाचे आदेशाची सत्यप्रत देण्याबाबत अर्ज केलला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक १९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १४.१२.२००७ रोजी निर्णय देण्यात येऊन तहसीलदार, हिंगणा यांनी संदर्भीय अपीलाची प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत असून आपण त्यात नमुद केलेल्या प्रकरणाचा शोध घेऊन त्यातील पारित आदेशाच्या प्रती किंवा प्रकरण पंजीबध्द केलेल्या रजिष्टरमधील पारित आदेशाच्या नोंदीची छायांकित प्रती १५ दिवसांचे आंत अर्जदारास पुरवाव्यात असा आदेश दिलेला दिसून येतो. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने अपीलकर्ती यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती तर उपलब्ध झाली नाहीच परंतु कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार त्या अर्जाप्रमाणे केलेला नाही असे अपीलकर्ती यांनी सांगितले. प्रथम अपीलाचे आदेशानंतर कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा उत्तरही दिले नाही व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मात्र विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना दिनांक १९.५.२००९ रोजी माहितीचा शोध घेतला व ती मिळाली नाही अशा प्रकारचे प्रतिवेदन श्री. एस. डी. पाटील, अति. माल जमादार, हिंगणा यांनी दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ती यांचे अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याचा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न हा आता पर्यंत झाला नाही असे दिसून येते. राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल झाल्यानंतर व दिनांक २१.५.२००९ रोजी सुनावणी आहे त्याकरिता श्री. एस. डी. पाटील यांचेकडून तसे प्रतिवेदन लिहून घेतलेले दिसून येते व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे वर नमुद केल्याप्रमाणे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी यापेक्षा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न केलेला नाही. त्याकरिता विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अभिलेखागारामध्ये प्रत्यक्ष

अपीलकर्ती यांचे उपस्थित नायब तहसीलदार यांचे निगराणीत मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध घेणे आवश्यक राहिल व त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळवून त्यांचे उपस्थितीत अभिलेखागारातील मागितलेल्या माहितीचा शोध नायब तहसीलदार यांचे निगराणीत घेऊन दोनही नस्ती मिळाल्यास अपीलकर्ती यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी व नस्ती उपलब्ध न झाल्यास जबाबदारी निश्चिती करिता पोलीसांकडे तक्रार करण्यात यावी व पोलीस चौकशी नंतर नस्ती उपलब्ध झाल्यास अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७६०- १७६२/२१.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६६/२००८.

श्री. अजय रामलखन मिश्रा,
६१, रतन नगर, मानकापूर,
नागपूर - ४४० ०३०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. संजय शरद गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे Technical spacification of R.C.C. & S.D.R.C. cover prepaired in २००६ Tender for aupply of various size & Types of manhole covers to various sizes of N.M.C. Nagpur. Year २००६-२००८ Attached "A" self. सदरची माहिती स्वत: घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ११.८.२००८ रोजी एकूण ९ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या

... २

माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.८.२००८ रोजी देण्यात आला असून विभागाकडे SFRC कव्हर्सचे डायमेंशनची माहिती उपलब्ध असल्यास अपीलार्थीस ८ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी. विभागाने मुद्या क्रमांक ३ च्या उत्तरात माहिती अजून मिळवावयाची आहे ती ८ दिवसात उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक ४ सुधारित माहिती ८ दिवसात माहिती द्यावी. मुद्या क्रमांक ८ मधील VNIT Laboratary Test Report ८ दिवसात द्यावी असे आदेश देऊन अपील मान्य केलेले दिसून येते व त्याकरिता अपीलकर्ता यांना दिनांक २५.८.२००८ रोजी माहिती उपलब करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी टेंडरच्या संदर्भातील मुद्येनिहाय गुणवत्तेच्याबाबत मुद्ये उपस्थित केलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे हे निश्चित आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीवरुन कोणत्याही प्रकारचे नवीन मुद्ये गुणवत्तेच्याबाबत अपीलात उपस्थित करता येत नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी स्वतःच टेंडर पेपर तयार केले होते व त्यावरुन त्यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांची तक्रार पुन्हा पुन्हा टेंडर त्यांनी कशा प्रकारे करावयास पाहिजे होते त्याबाबत दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही जशी कार्यालयात अर्ज करते वेळेत उपलब्ध आहे तशीच माहिती कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता कागदपत्रांचे स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे टेंडर पेपर जर जनमाहिती अधिकारी यांनी योग्य प्रकारे तयार केले नसेल तर त्याबाबत तक्रार त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचे वरिष्ठ सक्षम अधिकाऱ्यांकडे करणे आवश्यक राहिल. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७६३- १७६५/२१.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५८/२००८.**

श्री. धनराज घनश्याम लिखार,
आनंद नगर, प्लॉट नं. ५९८,
बिनाकी ले आऊट, गोंडपूरा,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
माहिती व सुविधा केंद्र (सेतु)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्रीमती राजलक्ष्मी शहा
जनमाहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
माहिती व सुविधा केंद्र (सेतु)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, माहिती व सुविधा केंद्र (सेतु), नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हयात अनुसूचित जमातीचे जाती प्रमाणपत्र निर्गमीत केल्याची नोंदवहीची प्रत मिळण्याबाबत एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १ जून २००७ ते ३१ मे २००८ पर्यंत असून सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी आज दिनांक २१.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास अपील क्रमांक ७५८/२००९ मध्ये माहितीच्या अर्जाची मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास माहिती अधिकारी तयार असल्याने मी माझी अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ १७६६/२१.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०३/२००८.

श्री. नरेंद्र राधेश्याम शर्मा,
गुड ओली, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नगरपालिका प्रशासन, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, कामठी, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. विजय देवळीकर, रजा राखीव मुख्याधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कामठी यांचेकडे राष्ट्रीय ध्वज अपमान, संपूर्ण घटनाक्रम, कलम बंद आंदोलन, पार्षदाचे वेगळे डेप्युटेशन व पत्रकार वार्ता संपूर्ण. माहिती व्यक्तिशः किंवा टपाल चालेल नोंदणी डाक, अथवा शिघ्र पोष्ट असे नमुद केलेले दिसून येते. सोबत दिनांक १.२.२००८ रोजी तक्रार अर्ज जोडलेला दिसून येतो. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना ३ मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध

... २

झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.४.२००८ रोजी देण्यात आला असून मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी २६ जानेवारी, २००८ ला राष्ट्रध्वज अपमानासंबंधी घटनेची त्यांचेकडे नोंद झाली असल्यास तसे अपीलार्थीस कळवावे. तसेच अशी नोंद झाली नसल्यास तसेही अपीलार्थीस कळवावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. आज जनमाहिती अधिकारी हे हजर नाहीत. आयोगाचे कार्यालयाकडून दिनांक १७.३.२००९ रोजी दिनांक २०.४.२००९ च्या सुनावणीची नोटीस काढलेली होती. परंतु दिनांक २०.४.२००९ रोजी सुनावणी झालेली नाही त्यामुळे पुढील तारीख ही आज सुनावणीची देण्यात आली होती. त्या तारखेलाही जनमाहिती अधिकारी हे गैरहजर होते व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा सुध्दा दाखल केलेला नव्हता. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही विभागीय आयुक्ताचे प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर यांनी करणे संयुक्तिक राहील.

४. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता त्यात कोणत्याही प्रकारचा संपूर्ण तपशील दिलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज, टिपणी अशी माहिती उपलब्ध असते त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती मागितलेली नसल्यामुळे व त्याबाबत कोणत्याही प्रकारची नोंद नगरपरिषद, कामठी कडे नसल्याने त्यांना कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही योग्य आहे असे दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा माहिती उपलब्ध असल्यास तसे कळवावे व नसल्यास तसे कळवावे असा आदेश दिलेला आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ५.४.२००८ च्या निर्णयात

आज जनमाहिती अधिकारी यांचे उत्तर कोणत्याही प्रकारे दाखल केले नाही किंवा त्याबाबत कोणतेही आकलन झालेले दिसून येत नाही व त्यामुळे नेहमीच्या सिरस्त्याप्रमाणे ठोकळबाज निर्णय दिलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेल्या माहितीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कामठी हे आयोगाकडे अपीलाचे सुनावणीस हजर राहिले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, नागपूर यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७६७- १७६९/२२.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०५/२००८.

श्री. राजू किसन वानखेडे,
श्रीराम वार्ड, ता. बल्लारपूर,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. ओमप्रकाश त्रिपाठी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. डॉ. भालचंद्र फळके,
जनमाहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, तोहोगांव,
ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.५.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे सौ. बी. एम. सुर्यवंशी, स्त्री आरोग्य सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र घुग्घुस यांना न्याय मिळण्याबाबत मी आपल्या कार्यालयाला आरोग्य केंद्र, तोहोगांव यांचे दिनांक २३.६.२००७ चे नुसार दिनांक १८.७.२००७ ला दिलेल्या पत्राचे संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती विचारलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित

... २

मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २८.२.२००८ रोजी सहा.माहिती अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी नंतर दिनांक १.३.२००८ रोजी विनंती पत्र व दिनांक १५.३.२००८ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे तक्रार सुध्दा दाखल केलेली दिसून येते. पुन्हा दिनांक २१.६.२००८ रोजी सुध्दा स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही किंवा निर्णय दिलेला नाही. अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे माहिती मागण्याचा अर्ज हा माहिती अधिकारी यांचेकडे केल्यास त्याबाबतचे उत्तर किंवा माहिती ही जनमाहिती अधिकारी यांनीच द्यावयाची असते. त्या निर्णयाविरुध्द प्रथम अपील केलेली असल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय द्यावयाचा असतो. त्याबाबतचे प्राथमिक ज्ञान प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांना दिसून येत नाही. त्यामुळे दिनांक २८.२.२००८ ला दिनांक २६.१२.२००७ च्या माहितीच्या अर्जाचे संदर्भात व दिनांक ५.२.२००८ च्या प्रथम अपीलाचे संदर्भात सहाय्यक माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते. यावरुन जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे आपली जबाबदारी कायम टाळत असतात असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्याबाबत त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्ता यांना आता माहिती उपलब्ध झाली असे अपीलकर्ता यांनी सांगितले. याचा अर्थ राज्य माहिती आयोगाकडून द्वितीय अपीलाचे सुनावणीची नोटीस निघाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे तरी जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे व सदरची प्रशासकीय कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी करणे आवश्यक आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांचा अर्ज व प्रथम अपील याबाबत योग्य ती कार्यवाही जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९९/२००८.

श्री. रघुनाथ चिंतामण पिंपरे,
रामपूरी वार्ड, ता. पवनी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. यशवीरसिंह,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वन विभाग, भंडारा.

श्री. डी. एच. राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू),
वन विभाग, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपवन अधिकारी, वन विभाग, भंडारा यांचेकडे एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. पवनी वनक्षेत्र कार्यालयाद्वारे केलेल्या वन तलाव (रो.ह.यो.)त शिल्लक असलेल्या कामा संदर्भात. माहितीचा कालावधी २००१ ते २००३ ते २००७ पर्यंतची मंजूर झालेल्या मौजा कोसमतोंडी, ता. पवनी रो.ह.यो. वन तलाव बनविण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे नंतर दिनांक ११.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.      अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची आता पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. अपीलकर्ता यांच्या दिनांक १२.१२.२००७ च्या अर्जावर नियमाप्रमाणे आपण सदर अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नाही. कोर्ट फी स्टॅम्प लावून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अर्जदाराचा दिनांक १२.१२.२००७ चा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १७.१२.२००७ रोजी प्राप्त झाला. अर्जदाराने पवनी वनक्षेत्र कार्यालयाद्वारे केलेल्या वनतलाव (रोहयो) व शिल्लक असलेल्या कामासंदर्भात एकूण १ ते १० मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी यांचे अधिनस्त वनक्षेत्रात सन २००१ ते २००३ ते २००४-२००७ पर्यंतची मंजूर झालेल्या मौजा कोसमतोंडी, तालुका पवनी येथे रोजगार हमी योजने अंतर्गत वनतलाव बनविण्याबाबतची असून ती ७ वर्षे जुनी, किचकट व प्रश्नोत्तर स्वरुपाची आहे. तसेच अर्जदारानी अर्जातील एकूण १ ते १० मुद्यात प्रश्नोत्तर स्वरुपात म्हणजे, काय कार्यवाही केली ? कोणत्या कामावर किती रक्कम कोणत्या अधिकाऱ्याने खर्च केलेली आहे ? तलावाची पाळ किती फुट उंच करणार आहात. रक्कम केव्हा पर्यंत खर्च होणार ? अशा स्वरुपाची माहिती. माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारास पुरविणे अभिप्रेत नाही. तरीही माहिती अधिकारी यांनी आपले आकलनानुसार अर्जदाराला माहिती देणे नाकारले नाही. टाळाटाळ केलेली नाही किंवा यामागे माहिती अधिकाऱ्यांचा कोणताही वाईट हेतु नव्हता. अर्जदारास नियमानुसार माहिती पुरविण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला आहे. परंतु माहिती जुनी व किचकट स्वरुपाची असल्याने व सहज उपलब्ध नसल्याने त्यामध्ये वेळ गेला आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक १५५०, दिनांक ११.६.२००८ अन्वये अर्जदारास माहिती पुरविली. माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदुपाने) यांचे स्वतंत्र असे कार्यालय नाही. तसेच त्यांचे स्वतःहाकडे कोणतीही माहिती नसते. त्यांना त्यांचे वनविभागांतर्गत येणाऱ्या १० वनपरीक्षेत्र अधिकारी तसेच उपवनसंरक्षक यांचे कार्यालयातील लिपीक/लेखापाल यांचे वरच अवलंबून राहून माहिती उपलब्ध असेल तर त्यांचे कडूनच प्राप्त करुन अर्जदाराला पुरवावी लागते. वर नमुद परिस्थितीत माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज ज्या दिवशी प्राप्त झाला त्याच दिवशी त्यांचे पत्र क्रमांक ७४७, दिनांक १७.१२.२००७ अन्वये संबंधितांकडून म्हणजे वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी यांचेकडून माहिती मागविली त्याची प्रत अर्जदारास पुरविण्यात आली आहे. (पत्राची प्रत अवनोकनार्थ सादर पान क्र. २) व उपवनसंरक्षक तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा

पृष्ठांकित केलेली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी यांचेकडून दिनांक ३१.१२.२००७ रोजीचे पत्रान्वये अंशतः काही माहिती प्राप्त झाली व त्यांचेकडून काही माहिती दिनांक ३१.३.२००८ रोजी प्राप्त झाली. अर्जदारानी अर्जावर नियमानुसार रुपये १०/- चा मुद्रांक शुल्क लावलेला नसल्यामुळे माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक ७८१, दिनांक २१.१.२००८ अन्वये अर्जदारास ते अवगत करुन दिलेले आहे. (पान क्र. ३) तसेच अर्जावर रुपये १०/- चे मुद्रांक शुल्क लावून जी माहिती माहिती अधिकाऱ्यांकडे उपलब्ध होती ती माहिती प्राप्त करुन घेण्यास कळविले आहे. वास्तविकता रुपये १०/- चा मुद्रांक शुल्क अर्जावर लावलेला नाही किंवा अर्जात नमुद दारिद्रय रेषेखालील दाखला जोडलेला नाही हे अर्जदारास आधिच कळवायला पाहिजे होते. परंतु माहिती अधिकाऱ्याकडे कोणीही लिपिक किंवा सहाय्यक नव्हते. तसेच सदर कालावधीत माहिती अधिकाऱ्यांकडे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे सुरु असलेली चार प्रकरणी (३१५/२००७ ते ३१८/२००७) सतत पाठपुरावा करणे, विभागीय चौकशी प्रकरणी तीन तेंदु हंगाम २००८ च्या लिलावाची कामे, मध्यवर्ती काष्ठ आगारावरील वनोपजाच्या लिलावाची कामे, ताडोबा येथील प्रशिक्षण व वनसर्व्हेक्षणा संबंधी इतर कामाच्या व्यस्ततेमुळे ३३ व्या दिवशी माहिती घेऊन जाण्यास अर्जदारास कळविले आहे. अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे व्यक्तिशः माहिती प्राप्त करणार असे असतांना सुध्दा त्यांनी कधीही माहिती घेण्यास माहिती अधिकाऱ्यांकडे संपर्क साधला नाही. त्यानंतर अर्जदाराने त्यांचे दिनांक ३.३.२००८ अन्वये प्रथम अपील उपवनसंरक्षक, भंडारा, वनविभाग, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक ७१४६, दिनांक ५.३.२००८ (पान क्र. ६) अन्वये लेखापाल रोहयो कक्ष व परिक्षेत्र अधिकारी पवनी यांचेकडून काही माहिती मागविली आहे व त्यांची प्रत अपीलार्थीस पुरविली आहे. तसेच माहिती अधिकाऱ्यांस खुलासा मागविला आहे. त्यानुसार माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक ९०८, दिनांक २५.३.२००८ अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांना खुलासा सादर केलेला आहे. (पान क्र. ७) त्यामध्ये स्पष्ट केलेले आहे माहिती पुरविण्याचे उद्येशाने १०/- रुपये कोर्ट फी लावून उपलब्ध असलेली माहिती घेऊन जाण्यास अर्जदाराला अगोदरच कळविले आहे. त्यामुळे शासकीय माहिती अधिकाऱ्यांकडून अर्जदाराला माहिती पुरविण्यासाठी जाणुनबुजुन किंवा वाईट हेतु ठेवून नाकारण्यात आले नाही अथवा टाळाटाळ सुध्दा करण्यात आले नाही. वनपरिक्षेत्र अधिकारी, पवनी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, भंडारा वनविभाग यांनी अपीलासंबंधाने

अपीलार्थीस त्यांचे पत्र क्र. १५५०, दिनांक ११.६.२००८ अन्वये एकूण १ ते २४ पाने माहिती पोष्टाने पुरविली आहे. कारण अर्जदाराने अपीलात माहिती व्यक्तिशः घेणार किंवा पोष्टाने असे नमुद केले नाही. (जावक नोंदवही व नमुक नोंदवहीची छायांकित प्रत पुरावा म्हणून जोडलेली आहे पान क्र. ८, ९ व १०). अपीलार्थीने द्वितीय अपीलात नमुद केले आहे अर्जदारास माहिती मिळाली नाही. जर अर्जदारास पोष्टाने पाठविलेली माहिती मिळाली नसेल तर त्यांना ती माहिती पुन्हा व्यक्तिशः माहिती अधिकारी यांचेकडून देता येईल. मा.महोदयांच्या नजनेस आणून देण्यात येत आहे की, अर्जदाराने सन २००५ पासून सन २००८ या कालावधीत अपीलात नमुद कोसमतोंडी तलावासंबंधाने अर्ज करुन माहिती मागितलेली आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे आहे. १) अर्जदाराने दिनांक १३.५.२००५ चे अर्ज प्राप्त दिनांक २७.५.२००५ माहितीचा तपशील केलेल्या तक्रारीवर वनविभागाकडून केलेल्या कारवाई बाबतची माहिती एकूण १ ते ५ सविस्तर मुद्दे माहिती व्यक्तिशः नमुद केल्याने त्यांना कळविण्यात आले. परंतु माहिती प्राप्त करण्यास माहिती अधिकाऱ्यांकडे कधीच संपर्क साधला नाही. २) अर्जदाराचे दिनांक ३१.१०.२००८ चे अर्ज प्राप्त दिनांक ३१.१०.२००८ सदर अर्जात सुध्दा अपीलात असलेल्या कोसमतोंडी वनतलावाच्या संबंधात एकूण १ ते १२ मुद्यांची माहिती मागितली होती. शासन स्तरावर केलेल्या तक्रारीबाबतच्या कार्यवाहीचा खुलासा. कालावधी १९९९ ते २००८ अर्जदारास सदर माहिती विहित मुदतीत निशुल्क व्यक्तिशः पुरविली आहे. विशेष म्हणजे एकीकडे अर्जदाराने दिनांक ३१.१०.२००८ चे अर्जात ५.२ हेक्टर त्यांची मालकीची जमीन असल्याचे नमुद केले आहे. (अर्जाची प्रत अवलोकनार्थ सादर) तर दुसरीकडे अर्जदार हे दारिद्रयरेषेखाली असल्याचा माहितीच्या अर्जासोबत दाखल जोडलेला आहे. याबाबत माहिती अधिकाऱ्यास शंका आल्याने माहिती अधिकाऱ्यांनी त्याची खात्री करण्यासाठी त्यांचे पत्र क्रमांक २८३, दिनांक २०.१२.२००८ (पान क्रमांक ११ ते १५) अन्वये मुख्याधिकारी, नगर परिषद, पवनी यांचेकडून माहिती मागविली असता त्यांचे नांव दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे यादीत समाविष्ट नाही. असे मुख्य अधिकारी, नगर परिषद, पवनी यांनी दिनांक २.१.२००९ चे पत्रान्वये कळविले आहे. (त्याची छायाप्रत अवलोकनार्थ सादर पान क्र. १६) म्हणजेच अर्जदार हे माहिती मागण्यासाठी दारिद्रय रेषेखाली असल्याचा दाखला जोडून शासनाची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. वरील प्रमाणे प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने प्रत्येक वेळी अर्जदाराचे कोणतेही अर्ज न नाकारता माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास माहिती पुरविण्याचा पुरेपुर प्रयत्न करुन माहिती पुरविली आहे. कोणत्याही प्रकारे

जाणूनबुजुन टाळाटाळ केलेली नाही. इतकेच नव्हेतर अर्जदाराने शासनाकडे व वरिष्ठ कार्यालयाकडे विविध कामांच्या तक्रारी करुन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या कामाची दबाव तंत्र वापरुन चौकशी करण्यास लावणे व तीच माहिती माहितीच्या अधिकाराचा वापर करुन मागविणे अशाही बाबी कार्यालयात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजावरुन आढळून आले आहे. तसेच आत्महत्तेबाबतचा इशारा सुध्दा प्रशासनास दिलेला होता. यावरुन अर्जदाराचा माहिती मागण्याचा हेतु फक्त शासनाचे कर्मचारी व अधिकारी यांना माहिती गोळा करण्यासाठी त्रास देणे आहे हाच एक निष्कर्ष काढता येतो. वरील विवेचनावरुन अर्जदाराने मागितलेली माहिती जुनी, व्यापक व किचकट तसेच प्रश्नोत्तर स्वरुपाची असली तरी सुध्दा अर्जदारास माहिती पुरविली आहे. उपरोक्त नमुद केलेली परिस्थिती विचारात घेऊन अर्जदारास माहिती पुरविलेली असल्याने सदर अपील अर्ज खारीज करण्यास नम्र विनंती करण्यात येत आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २२.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७७३- १७७७/२२.५.२००९

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८२/२००८.

श्री. निमाई अनिल दास,
बिरसी कॅम्प, पो. परसवाडा (कामठा),
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय
(पुनर्वसन विभाग), जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी यांच्या वतीने श्री. एस. एस. राजगुरु, विशेष भुअर्जन अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी (पुनर्वसन) चंद्रपूर यांचेकडे जमीन देकर पुनर्वास किया गया उसका जी. आर. १९७० मे बंगलादेश से आये बंगलादेशी शरणार्थीयों को जमीन देकर मकान, कृषी साधन आदि देकर पुनर्वास किया गया उसका जी.आर. (शासन निर्णय) मिलनेबाबत. महाराष्ट्र मे गडचिरोली जिल्हे में ४८ बंगाली गांव तथा गोंदिया जिल्हे में ७ गांव ऐसा कुल ५५ बंगाली गांव मे ५३८७ परिवारों को जमीन देकर पुनर्वास किया गया उन परिवारों को जमीन देने के लिये जिस जी. आर. का उपयोग किया गया उसका झेरॉक्स प्रत मिलनेबाबत. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे

घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन दिनांक २१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. बंगाली निर्वासीत लोकांचे पुनर्वसन मा. संचालक, सहाय्यता व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयामार्फत करण्यात आले होते. हे कार्यालय आता शासनाने सन १९९८-९९ पासून पुर्णपणे बंद केलेले आहे. सदर कार्यालयाचा अभिलेख हया कार्यालयास हस्तांतरीत झालेला नाही. रेकॉर्ड संपूर्ण मोठया जुन्या इमारतीमध्ये बस्ते बांधुन ठेवण्यात आलेला आहे आणि कोणता रेकॉर्ड कुठे ठेवण्यात आलेला आहे हे नक्की माहिती नाही. काही रेकॉर्ड पुर्वी त्या कार्यालयात जे कर्मचारी कार्यरत होते त्यांना घेऊन शोध घेतला असता प्राप्त झालेला महत्वाचा शेत जमीनीचा व कुटुंब विवरण पत्रिकाचा रेकॉर्ड छाणणी करुन मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे मार्फतीने मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. यापुर्वी सदर अर्जदाराने या कार्यालयास दिनांक ६.१२.२००७ ला ही माहिती मिळण्यास अर्ज सादर केला होता. तेव्हा त्यांचे समक्ष पुर्वीचे जुने कार्यालयात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन रेकॉर्डचा शोध घेतला असता चंद्रपूर जिल्हयातील ५५ गावांचे पुनर्वसनाबाबत (बंगाली/शरणार्थी) शासन निर्णयाचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाही संबंधातील मिनिटसची प्रत प्राप्त झाली ती अर्जदारास पुरविण्यात आलेली आहे आणि त्यांनी ती स्विकृत करुन घेतली आणि या कार्यालयास अर्जाव्दारे लिहून दिले की, माहितीच्या अधिकारामध्ये मागणी केलेल्या जी. आर. (शासन निर्णयाची) आता आवश्यकता नाही. त्या अर्जाची झेरॉक्स आपले अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कार्या-६/पुनर्व/टे-२/२००८/९६७, दिनांक १५.१०.२००८ अन्वये अर्जदारास कळविण्यात आले. मा.अप्पर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडील प्रथम अपील सुनावणी दिनांक १७.११.२००८ रोजीचे वेळी अपीलार्थीला पाहिजे असलेली माहितीचे संबंधात कळविलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना दिनांक १५.१०.२००८ रोजी मागितलेल्या माहितीचे संदर्भात कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिनांक २०.११.२००८ रोजी देण्यात आलेला दिसून येतो व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७७८- १७८०/२६.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७७८/२००८ व अपील क्रमांक ९०५/२००८.

श्री. बाबा बळीराम किलनाके,
मु. पो. पिपरी, ता. हिंगणघाट,
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. डी. धापके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिंगणघाट,
जि. वर्धा.

श्री. देवतळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत कार्यालय, पिपरी,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२००८ रोजी व दिनांक ३०.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दोन्ही अपीलांमध्ये दिनांक ३०.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय ग्राम पंचायत, पिपरी यांचेकडे सन २००४ ते २००८ हया कालावधी हया रस्त्यासंबंधी घेतलेल्या निर्णया बद्यलची सविस्तर माहिती. सदरची माहिती सर्वसाधारण नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने

... २

अपीलकर्ता यांना दिनांक ३०.७.२००८ ला माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००८ रोजी तत्पुर्वी प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.८.२००८ रोजी देण्यात आला असून सरपंच, ग्राम पंचायत, पिपरी यांना प्रत्यक्ष चौकशी करुन व मालकी हक्काचे कागदपत्राची शहानिशा करुन मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५३(१) (२) नुसार अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करुन देण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पंचायत समितीला सादर करावा असा आदेश दिलेला दिसून येतो व अपीलकर्ता यांना प्रतिलिपी दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची दोनही अपीले हे खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७८१- १७८२/२६.५.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८१/२००८.

श्री. कृष्णा नागोराव पाटील,
कौशल्यायन नगर, पो. भगवाननगर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरिक्षक,
नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
नागपूर, ग्रामीण नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. अवस्थी, प्रभारी वाचक, पोलीस उपअधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७, रोजी २ अर्ज व दिनांक ७.४.२००७ रोजी २ अर्ज जनमाहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, नागपूर यांचे कार्यालयात १) श्री. संदीप यावलकर, २) श्री. प्रविण पडधरिया, ३) श्री. धनराज गहुकार, ४) श्री. युवराज गहुकार, ५) श्री. सुधाकर गहुकार झाडे तोडून चोरुन नेल्याबाबत मौजा पिलकापार, तालुका कळमेश्वर यांचेबाबत केलेल्या तक्रारीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. या सर्व अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.५.२००७ रोजी वाचक पोलीस उपअधिक्षक तथा माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांनी अर्जदारास

... २

पुरविलेली माहिती व अनुषंगीक अभिलेखाच्या प्रती या कार्यालयास सादर करण्याचे कळविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचा अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांचेकडे माहिती पुरविण्यासाठी पाठविण्यात आली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.४.२००७ व दिनांक २९.४.२००७ रोजी माहिती मुदतीत पुरविण्यात आलेली आहे असे उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांनी कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण, नागपूर यांनी विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांना पत्रातील माहितीच नाही विवरणपत्र दाखल केलेले आहे. त्यानंतर सुध्दा त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सुरुवातीला दिवाणी वाद आहे असे कळविण्यात आले होते. परंतु पोलीसांनी सुध्दा गुन्हा दाखल केला मात्र अटक केली नाही. माहिती आयोगासमोर अटकेच्या संदर्भात मागणी करीत होते. परंतु माहिती ही सर्व कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मागता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या सर्व माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २६.५.२००९**

HIREKHAN/BHUJI/१७८३- १७८४/२६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८५/२००८ व अपील क्रमांक ७८६/२००८.**

श्री. रमेशकुमार मनोहरलाल बाली,
फुटाना ओली, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रधान,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर.

श्री. बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद (बांधकाम विभाग),
ता. कामठी, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
कर अधिक्षक,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००८ रोजी व दिनांक ३.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. कर अधिक्षक तथा जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२.  अपील क्रमांक ७८५/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००८ रोजी मुख्याधिकारी (बिजली विभाग), नगरपरिषद, कामठी यांचेकडे ड्रॅगन प्लेस टेंपल मे इलेक्ट्रीक कनेक्शन के लिये जो एनओसी दि गई उसकी कॉपी दी जावे. उसी परिसरमें स्थित मिनरल वॉटर प्लॉट (Aqua ७ up) के लिये दि गई एनओसी की कॉपी दि जावे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.७.२००८ रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी सदर माहिती सन १९९९ मधील असून त्या माहितीचा शोध घेऊन आठ दिवसाचे आंत देण्याचे कबुल केले. तरी आपण माहिती अधिकारी यांचेकडून विहित वेळेत माहिती प्राप्त करुन घ्यावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येते. परंतु तरी सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.  अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आता पर्यंत ते मागितलेली माहिती घेण्यासाठी बऱ्याच वेळा गेले परंतु त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता हे माहिती घेत नाहीत. माहिती घेण्यास नाकारतात त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. माहिती ही तयार आहे. अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपीलकर्ता यांना उत्तर कळविले नाही. ३० दिवसांमध्ये जनमाहिती अधिकारी यांचेकडे स्वतः जाऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असते व तशी उपलब्ध करुन न दिल्यास त्याबद्यल आक्षेप घेणारे पत्र देणे आवश्यक असते. परंतु तशा प्रकारचा पुरावा अपीलकर्ता यांनी दाखल केलेला नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आग्रह धरावे लागते. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता हे माहिती घेण्यास तयार नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मान्य करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ७८६/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, नगरपरिषद, कामठी यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.९.२००८ रोजी २ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये माहिती ही सन १९९५ चे संदर्भातील असल्यामुळे नस्ती ही उपलब्ध झाल्यावर माहिती देता येईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाचे विरुध्द अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी तथा प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकूण घेतल्यानंतर प्रतिवादीनी माहिती उशिरा दिली असली तरी प्राप्त झाली व याबाबत काहीही तक्रार नसल्याचे म्हटले आहे. प्रतिवादी माहिती आकिारी तथा कर अधिक्षक, नगर परिषद, कामठी यांनी पुरविलेल्या माहितीबाबत अपीलार्थी श्री. रमेशकुमार बाली यांनी माहितीबाबत काहीही तक्रार नसल्याचे सांगितले. त्यामुळे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उशिरा व माहिती चुकीची मिळाल्यामुळे अपील केले आहे असे कारण दिलेले दिसून येते. परंतु आता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, त्यांना पुन्हा मुद्या क्रमांक ३ ची माहिती जी उपलब्ध झाली आहे ती आता उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपीलकर्ता यांचे संदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. वरील प्रकरणी माहिती अर्ज प्राप्त झाल्यावर त्यावर कार्यवाही करण्यासाठी माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, श्री. बोरकर निलंबित असल्याने नियमानुसार कार्यवाही करणे शक्य झाले नाही. कामठी येथील राणी तलावाच्या शेजारी मोक्षधामासाठी शासनाने मंजूरी दिलेल्या ४८०० + ३५०० चौ.मी. जागेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात झालेल्या दिरंगाई प्रकरणी श्री. बोरकर यांना दिनांक ३०.६.२००८ ते दिनांक १२.९.२००८ या कालावधीत निलंबित करण्यात आले होते. नगर परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागात १ कनिष्ठ अभियंता, १ सब ओव्हरसियर व २ कनिष्ठ लिपिक असून श्री. बोरकर यांचा अतिरिक्त कार्यभार सब ओव्हरसियरकडे सोपविल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले असले तरी सदर कार्यभार तांत्रिक दृष्टया सांभाळणे त्यांना शक्य नसल्याची बाब विचारात घेऊन सदर पद तातडीने भरण्यासाठी नगरपरिषद

... ४

संचालनालय, मुंबई यांना विनंती करुनही पद रिक्त राहिल्याने कामावर विपरीत परिणाम झाला ही वस्तुस्थिती कृपया विचारात घेण्यात यावी. श्री. बाली व मुन्ना मुजाहीद यांनी नगरपरिषद, कामठीकडे वेळोवेळी सर्व विभागातील माहिती प्राप्त करण्यासाठी अर्ज केले आहेत. किंबहुना तहसील ऑफीस इत्यादी कार्यालयातून अधिकारी/कर्मचारी यांचेवर आरोप करण्यासाठी त्यांनी माहिती अधिकाराचा दुरुपयोग केलेला आहे. माझा मुलगा चि. प्रथमेश गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मसी बी फार्मसी मध्ये दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. श्री. बाली यांनी मी जात/आडनांव बदल्याचे नमुद करुन कॉलेज प्रशासनाकडे अर्ज दाखल केला. वास्तविकता फार्मसीच्या प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी डीईटी, मुंबई यांचेकडून सीईटी परिक्षा घेऊन गुणवत्तेनुसार कॉलेज ठरवून रितसर केली जाते ही बाब श्री. बाली यांना माहित नसावी. माझ्या व्यक्तिगत अनुभवावरुन असे निदर्शनास येते की, श्री. बाली यांचा माहिती जमा करण्याचा हेतु निश्चितच सरळ नाही तरी मा.माहिती आयुक्त यांचेशी दिनांक २०.५.२००९ रोजी झालेल्या चर्चेनुसार सदर अहवाल सादर करण्यात येत आहे. नगर परिषद, कामठीच्या विकास कार्यात छोटया नाली दुरुस्तीच्या कामाच्यावेळी नजिक मोठे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून काम करुन घेण्यात येते. अर्थातच त्यांचे रेकॉर्ड कोणी विचारल्यास माहिती देणे शक्य होणार नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये अपीलकर्ता हे मुख्याधिकारी, नगरपरिषद, कामठी यांना वेळोवेळी माहिती मागतात असे म्हटले आहे. परंतु अधिकारी व कर्मचारी यांचेवर आरोप करण्यासाठी त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा दुरुपयोग केलेला आहे. त्यांच्या स्वतःच्या मुलाच्या संदर्भात जात व आडनांव बदल्याचे नमुद करुन कॉलेज प्रशासनाकडे अर्ज दाखल केला. वास्तविकता फार्मसीच्या प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी डीईटी, मुंबई यांचेकडून सीईटी परिक्षा घेऊन गुणवत्तेनुसार कॉलेज ठरवून रितसर केली जाते ही बाब श्री. बाली यांना माहित नसावी. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गैरवापर करीत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित आहे असे आढळून येत नाही. यापुढे अपीलकर्ता यांनी त्रास देण्याकरिता वैयक्तिक माहिती मागितली असेल तर त्यांचे विरुध्द मुख्याधिकारी, नगरपरिषद, कामठी यांनी पोलीसांकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील.

... ५

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७८५/२००८ व अपील क्रमांक ७८६/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सदरची माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८७/२००८.

श्री. नरेंद्र राधेश्यामजी शर्मा,
गुड ओली, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रधान,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर.

श्री. बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद (बांधकाम विभाग),
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२००८ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे जयस्तंभ चौक से गोयल टॉकीज रोड होते हुये अग्रवाल लॉटरी भंडार चौक तक रोड की संपूर्ण माहिती एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २८.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.	अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना आता पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु त्यांनी माहिती व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे असा पर्याय दिलेला असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन घेण्यास अपीलकर्ता यांनी सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचेकडे स्वतः जाणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे पुरावा दाखल केलेला नाही. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, संबंधित माहिती तयार करुन ठेवली व अर्जदाराने माहिती उपलब्ध करुन घेतली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, माहिती तयार आहे हे निदर्शनास आणल्यामुळे ही माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ९.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/१७९०- १७९१/२६.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८८/२००८.**

श्री. मुजाहिदुल हक अंसारी व. मो. हनीफ अंसारी,
ईस्माईलपुरा, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रधान,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर.

श्री. बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद (बांधकाम विभाग),
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कामठी यांचेकडे गुजरी बाजार चौक (फेरुमल चौक) पर आनंद मेडिकल स्टोर के पाससे झंडेके निचेसे चौक को क्रास कर चनेकी दुकान के पास निकली नाली व झंडेके निचे बना नाली का चेंबर बनाया गया इस काम के प्रस्ताव व मंजूरी पत्र, टेकनिकल रिपोर्ट, कम्पलीशन रिपोर्ट, नोटशीट की कॉपी तथा वर्क आर्डर व यह किस निधीसे बनाई गई, इस कामपर होने वाले खर्च की पूर्ण माहिती चाहिये. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, ते माहिती घेण्याकरिता बऱ्याच वेळी कार्यालयात जातात परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ते माहिती उपलब्ध करुन घेत नाही. माहिती घेण्यास नकार देतात व त्यामुळे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ७.२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २६.५.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९९/२००८.

श्री. यादोराव दागो वाढई,
मु. सावंगी, पो. ब्राम्हणी सडक,
ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया - ४४१ ८०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. यु. एल. वाघाये,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सडक अर्जुनी,
जि. गोंदिया.

श्री. एस. सी. तागडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत सावंगी,
ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, सावंगी यांचेकडे जुलै २००६ ते एप्रिल २००७ पर्यंत ग्राम पंचायतचे दस्ताऐवजाबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.४.२००८ रोजी प्रथम

अपील दाखल केलेले दिसून येते.  परंतु सदरची तारीख ही चुकीची दिसून येते.  कारण अपील दाखल करावयाची अंतीम तारीख ३१.८.२००७ दिलेली आहे व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.  जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २४.८.२००७ रोजी माहिती घेऊन जावी असे कळविले होते.  प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ३ दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्याबाबतची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली आहे.  तसेच दिनांक २७.११.२००८ रोजी सुध्दा काही माहिती दिलेली आहे व अपीलकर्ता यांनी पोच सुध्दा दिलेली आहे.  त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**